दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२७९ गुरुवार दि.१८ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-279 Thursday, Dt.18 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## २६ जून रोजी वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंताचा सत्कार

### गुणवंत विद्यार्थ्यांनी सत्कारासाठी नोंदणी करावी – जगद्विवेक प्रतिष्ठान

बीड /प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख रकमेसह मान्यवरांच्या शुभहस्ते शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी जाहीर नागरिक सत्कार करण्यात येणार आहे. या सत्कारास

पान २ वर...

# बीडमधील अतिक्रमण हटाव कारवाईत फळ विक्रेत्यांचे 'विक्टिम कार्ड' अपयशी!

## स्वतःच गाड्या उलटवून पोलिसांना बदनाम करण्याचा कट सामाजिक कार्यकर्त्यांकडूनच उघड

बीड प्रतिनिधी

नगर नाका चौकात बीड- अहिल्यानगर महामार्गावर नगर परिषद व वाहतूक शाखेच्या वतीने अनधिकृत अतिक्रमणांवर धडक कारवाई करण्यात आली. वारंवार सूचना देऊनही रस्ता न सोडणाऱ्या मुजोर फळ विक्रेत्यांनी कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी व प्रशासनावर दबाव आणण्यासाठी स्वतःच्या हाताने आपल्याच गाड्या रस्त्यावर उलटवल्या आणि गोंधळ घातला. यानंतर रस्त्यावरील सांडलेल्या फळांचे फोटो सोशल मीडियावर पसरवून प्रशासनाला बदनाम करण्याचा खोटा कांगावा केला.सामाजिक कार्यकर्त्यांनी उघड केले सत्य

घटनास्थळी उपस्थित असलेल्या सजग सामाजिक कार्यकर्त्यांनी या संपूर्ण प्रकाराचे



बीड – नगरपालिकेच्या सूचनेनुसार शहर वाहतूक शाखेचे पोलीस आणि नगरपालिकेचे कर्मचारी रस्त्यावरील अतिक्रमण करणाऱ्या फळ विक्रेत्यांना अतिक्रमण काढण्यासंदर्भात फक्त विनंती करत होते. हे छायाचित्रात स्पष्टपणे दिसत आहे.



बीड –नगर रोड वरील मुजोर अतिक्रमणधारकांनी नियमानुसार बेकायदेशीर अतिक्रमण हटवणाऱ्या पोलिसांना आणि नगरपालिका प्रशासनाला बदनाम करण्यासाठी स्वतःच फळे रस्त्यावर फेकून त्यांनीच पोलीस आणि प्रशासनाने अतिरेक केल्याचे भासवले. हे देखील व्हिडिओमध्ये स्पष्ट झाले आहे. जे छायाचित्रांमध्ये ही दिसत आहे.



बीड – अतिक्रमण धारकांनी स्वतःचेच फ्रुट पायदळी तुडवून हातगाडे रस्त्यावर फेकत अक्षरशः तमाशा केला. पोलीस आणि नगरपालिका प्रशासनावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न देखील केला.हा एक प्रकारे अतिरेकच झालेला आहे.

व्हिडिओ चित्रीकरण केले होते. यामध्ये विक्रेते स्वतःच गाड्या पलटवून फळे फेकत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. हा खोटेपणा उघड झाल्यानंतर, शहरातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी घटनास्थळी येऊन या धडक कारवाईचे जाहीर समर्थन केले आणि कर्तव्यदक्ष पोलीस प्रशासनाचे स्वागत केले.बीड शहराला कोंडीमुक्त आणि सुरक्षित करणे हे आमचे कर्तव्य आहे. अशा कोणत्याही खोट्या बातम्यांना, अफवांना किंवा दबावतंत्राला प्रशासन बळी पडणार नाही. शासकीय कामात अडथळा आणणाऱ्यांवर आणि बदनामी करणाऱ्यांवर कडक कायदेशीर गुन्हे दाखल केले जातील. वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणधारकांविरुद्ध ही मोहीम अशीच तीव्रतेने सुरू राहील.

## शिवदुर्गा : शिवसंवाद दौऱ्यानिमित्त आज आंबेजोगाई येथे

### केज–परळी विधानसभा महिला आघाडीची बैठक

बीड /प्रतिनिधी

शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि शिवसेनेचे संसदीय गटनेते डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर सुरू असलेल्या 'शिवदुर्गा : शिवसंवाद दौऱ्या'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, या दौऱ्याच्या निमित्ताने गुरुवारी (दि. १८) केज व परळी विधानसभा मतदारसंघातील महिला आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

अंबाजोगाई येथील हॉटेल पीयूष येथे दुपारी ३ वाजता होणाऱ्या या बैठकीस शिवसेना नेत्या मीनाताई कांबळी,

पान २ वर...

## पेठ बीड पोलीसांनी कत्तलीसाठी घेवुन जात असणा–या



## ७ गोवंशीय जनावरांची केली सुटका

परळी /प्रतिनिधी

गोवंश जातीची जनावरे डांबुन ठेवल्याची खात्री होताच पोलीस उपनिरीक्षक साईनाथ बारगळ यांना पोलीस स्टाफ सह पाठवुन डांबुन ठेवलेल्या ७ गोवंशीय जनावरे किंमती ८६००० रुपयाची असलेली यांची सुटका केली.

दिनांक १६/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजण्याचे सुमारास पोलीस ठाणे

पान २ वर...

## मातंग समाजाला आरक्षणात उपवर्गीकरण करुन आमचा हक्क द्या : राजेश घोडे

### मुख्यमंत्री फडणवीसांना दिला सत्काराचा शब्द तर विरोधकांना दिला 'टांगा पलटी'चा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेल्या समतेचा रथ आता थांबणार नाही. मातंग समाजातील सर्वात वंचित घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी उपवर्गीकरण आरक्षण हेच एकमेव उत्तर आहे, असा कडक पवित्रा आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे यांनी घेतला.

बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. १६ जुन २०२६ रोजी झालेल्या मातंग क्रांती मोर्चातून राजेश घोडे यांनी सरकारला थेट इशारा दिला.

वंचित समूहातील वंचित घटक आजही सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मागे आहे. त्याला मुख्य प्रवाहात



आणल्याशिवाय बाबासाहेबांच्या स्वप्नांची पूर्तता होणार नाही. म्हणून उपवर्गीकरण झालेच पाहिजे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपवर्गीकरण करून देण्याचा शब्द दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले. जर मुख्यमंत्र्यांनी आमच्या वंचितातील वंचित घटकाला न्याय दिला, तर आम्ही १० हजार समाजबांधवांसह त्यांचा जाहीर सत्कार करू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

मात्र याचवेळी त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. राष्ट्रवादी आणि काँग्रेसने काही

पान २ वर...



## तुकाई उपसा जलसिंचन योजनेची कामे १५ जुलैपूर्वी पूर्ण करा

### विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे

मुंबई /प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील (जि. अहिल्यानगर) शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ तातडीने उपलब्ध व्हावा, यादृष्टीने तुकाई उपसा सिंचन योजनेची प्रलंबित कामे १५ जुलैपूर्वी पूर्ण करावीत असे स्पष्ट निर्देश देत, मिरजगाव येथील भैरवनाथ उपसा सिंचन योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास त्वरित सादर करावा अशा सूचना विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिल्या.

पान २ वर...

## राजधानीत महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन





नवी दिल्ली /प्रतिनिधी

मेवाडचे क्रांतीसूर्य राजे महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त आज राजधानीत त्यांना अभिवादन करण्यात आले.कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव श्वेता सिंघल यांनी राजे महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहाय्यक निवासी आयुक्त नितीन शेंडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखा अधिकारी निलेश केदारे, निवासी उपअभियंता जमुनाप्रसाद गंगवार, व्यवस्थापक प्रमोद कोलपत्ते यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

याप्रसंगी व्यवस्थापक प्रमोद कोलपत्ते यांनी मेवाडचे क्रांतिसूर्य राजे महाराणा प्रताप यांच्या यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला.

## चोरटी वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला



### वाळू माफिया बाळू खेडकर विरुद्ध गुन्हा दाखल

बीड /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात आणि चकलांबा परिसरातील वाळू माफिया बाळू उर्फ रत्नेश्वर शहादेव खेडकर याच्या विरुद्ध चकलांबा पोलिसांनी अवैधरित्या चोरटी वाळू वाहतूक करतांना पकडल्याने गौण खनिज उत्खनन आणि भारतीय दंड संहिता कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे. गेल्या अनेक दिवसापासून चोरटी वाळू वाहतूक करून उखळ पांढरे करणाऱ्या या वाळू माफिया विरुद्ध कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आलेली होती.

गेवराई तालुक्यात आणि चकलांबा परिसरात गेल्या अनेक वर्षापासून पोलिसांच्या छुप्या पाठिंब्यामुळे बाळू

पान २ वर...

## घरफोडी करणारा सराईत आरोपी पकडला

### स्थानिक गुन्हे शाखेला दोन घरफोडीचे गुन्हे उघड करण्यात यश

बीड /प्रतिनिधी

दिनांक १५.०६.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारमार्फत माहीती मिळाली की, कलीम अलीम शेख हा नाळवंडी नाका, बीड या ठिकाणी कोणाची तरी वाट पाहत थांबलेला आहे अशी माहीती मिळताच पथकाने त्यास नाळवंडी नाका येथे झडप मारुन पकडले. त्यास वरील गुन्हया संदर्भात चौकशी केली असता गुन्हा केल्याचे कबुली दिली आहे.

फिर्यादी यांनी दिनांक ०९.०६.२०२६ रोजी आपल्या घराचा लॉक लावून कुटंबीयासह बाहेरगावी गेले असता अज्ञात चोरट्याने त्यांचे बंद घराचे कडी कोंडा तोडून आतमध्ये कपाटात ठेवलेले सोने व नगदी मुद्देमाल चोरुन घेवुन गेल्याने पोलीस ठाणे शिवाजीनगर गुरनं १५५/२०२६ कलम ३३१(३) (४) बी.एन.एस अन्वये अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलीस ठाणे शिवाजीनगर व स्थानिक गुन्हे शाखेच्या



पथकाने घटनास्थळी भेट देवून संमातर तपास चालु केला होता. याचेमध्ये सिसिटिव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाचे आधारे सदरील गुन्हा हा कलीम अलीम शेख, दहीफळ ता.जि बीड याने केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले होते. त्यावरुन आरोपीचा शोध सुरु होता परंतु आरोपी मिळुन येत नव्हता.त्यास मोठ्या शिताफीने पकडल्यानंतर त्यास आनखी कोठे कोठे घरफोडी केली आहे या बाबत

पान २ वर...



संपादकीय....

# आजच्या राजकारणात सिद्धांत मुल्ये, निष्ठा वैचारिकता हरवली आहे...?

बीड - आजच्या राजकारणात सिद्धांत, मूल्ये, निष्ठा आणि वैचारिक अधिष्ठानाचे स्थान लोप पावताना दिसत आहे. जनसेवा हे मुख्य ध्येय मागे पडून केवळ 'सत्तेचे व स्वार्थाचे राजकारण' उरले आहे. वैचारिकतेचा हा अभाव लोकशाहीसाठी अत्यंत घातक असून, सुजाण नागरिकांच्या जागरूकतेनेच ही स्थिती बदलू शकते.

सत्तेचे राजकारण आणि आयाराम-गयाराम:

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांत राजकारणात स्पष्ट विचारसरणी (उदा. समाजवाद, गांधीवाद, लोकशाही) पाहायला मिळत होती. मात्र, आता 'कोणत्याही मार्गाने सत्ता मिळवणे' हेच एकमेव उद्दिष्ट उरले आहे. राजकीय स्वार्थासाठी पक्ष बदलणे, एका रात्रीत निष्ठा बदलणे हे सर्रास सुरू आहे.वैचारीक व नैतिक राजकीय सिद्धांत स्वतः यांच्या स्वार्था पुढे क्षणंभर सुद्धा तग धरू शकत नाहीत अशी परिस्थिती सध्या राजकारणात निर्माण झाली आहे.पक्षनिष्ठा हि खेळण्यातील खुळखुळा झाली आहे.विभिन्न विचार असले तरी स्वार्थासाठी एकरूप होणारी वृत्ती राजकारणात सध्या झपाट्याने वाढत आहे.नितिमुल्य शुन्य राजकारणी सत्तेच्या चाव्या आपल्या हातात ठेवण्यासाठी कोणत्याही थराला जाऊन स्वार्थ साधण्यासाठी वैचारिक तडजोडी करत आहेत.

समाजकारणाचा विसर:

पूर्वीचे राजकारण हे समाजकारणाचे माध्यम होते. नेत्यांमध्ये जनहिताची तळमळ असायची. आजच्या काळात राजकारण हा एक नफ्याचा व्यवसाय बनला आहे. योजनांमधील भ्रष्टाचार, घराणेशाही आणि स्वतःचे खिसे भरणे याकडेच अनेक राजकारण्यांचा कल असतो.हवे तशे उद्योग धंदे करण्यासाठी हवी तशी तडजोड करण्याची वृत्ती वाढत आहे.अशा वृत्तीमुळे मुळ सिद्धांत वैचारीकता व निष्ठा ही लोप पावत चालली आहे.राजकारण्यानां सामाजिक बांधिलकीचा विसर पडला आहे.

सत्तेसाठी संकुचित अस्मितेचा वापर

वैचारिक मुद्द्यांवर (उदा. शिक्षण, रोजगार, आरोग्य, विकास) निवडणूक लढवण्याऐवजी धर्म, जात, भाषा आणि प्रादेशिक भावना भडकवून मते मिळवली जातात. यामुळे समाजात फूट पडते आणि देशाचा मूळ विकास भरकटतो.मोठ्या प्रमाणावर जातीय दंगली सत्तेसाठी ठरवुन घडवुन आणल्या जातात.विकास, प्रगती,शेती विषयक धोरण, बेरोजगारी निर्मूलन, रोजगार निर्मिती, सामाजिक समन्वय या सारख्या अनेक बाबी बाजूला सारून फक्त सत्तेवर टिकवून राहण्यासाठी वाटेल तशा तडजोडी करण्यात येत आहेत.सत्तेसाठी संकुचित वृत्ती वाढत आहे.

वैचारिक शून्यता आणि गुन्हेगारीकरण

राजकारणातील गुन्हेगारीकरण वाढीस लागले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक जेव्हा सत्तेत येतात, तेव्हा तेथील विचारसरणी व नीतिमत्ता पूर्णपणे नष्ट होते. पैशाच्या आणि बाहुबलाच्या जोरावर निवडणुका जिंकल्या जात असल्याने, सामान्य व अभ्यासू कार्यकर्त्यांना राजकारणात संधी मिळणे कठीण झाले आहे.अशा गढुळ राजकीय वातावरणामुळे वैचारिक बांधिलकी असलेले विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते राजकारणाकडे वळत नाहीत.त्यामुळे सामान्य माणसाला लवकर न्याय मिळत नाही.

उपायांची आवश्यकता (मार्ग)

हरवलेले राजकारण पुन्हा वैचारिक मार्गावर आणण्यासाठी खालील पावले उचलणे गरजेचे आहे:

सुशिक्षित तरुणांचा सहभाग

राजकारणात उच्चशिक्षित आणि चारित्र्यवान तरुणांचा विचारवंताचा प्रवेश आवश्यक आहे.

मतदारांची जागरूकता

मतदारांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन विकासशील,राष्ट्रनिष्ठ, सामाजिक बांधिलकी असलेले कार्यकर्ताव त्याच्या.कार्याचे व विचारांचे मूल्यमापन केले पाहिजे.

पारदर्शकता आणि कायदा

राजकीय पक्षांमध्ये लोकशाही असावी आणि भ्रष्ट नेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. पक्षनिष्ठेसोबत वैचारिक बांधिलकी जोपासण्यासाठी कठोर नियमावली लागू करण्यात आली पाहिजे.पक्षांतर बंदी कायदा अधिक बळकट करणारे धोरण निवडणूक आयोग हा स्वतंत्र निर्णयक्षम असणे आवश्यक आहे. निवडणूक संबंधित कारवाई वर तात्काळ निर्णय होणे गरजेचे आहे.विनाकारण कोर्टात हे प्रकरण वर्षानुवर्ष प्रलंबित राहिले नाही पाहिजे.

राजकारण ही समाजाला दिशा देणारी व्यवस्था आहे. जर राजकारणातून विचार ,मुल्य आणि सिद्धांत हरवले तर, लोकशाहीचा अस्त होईल.समाज दिशाहीन होईल. देशाच्या भल्यासाठी सत्तेच्या राजकारणापेक्षा तत्त्वनिष्ठ समाजकारणाची आज नितांत गरज आहे.

**टी.सी हरवली आहे.**

**प्रतीक संजय कोल्हे रा. धनगरपिंपरी तालुका अंबड जिल्हा जालना यांची आदर्श इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल अंबड ची १० वी पासची टी सी छत्रपती संभाजीनगर ते अंबड प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणास सापडल्यास या नंबर वर संपर्क ९८२३०८२६८१ साधावा**

## भोकरदन पोलिसांची धडाकेबाज कारवाई लग्नाचे आमिष दाखवून

# विधवा महिलेवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला अवघ्या २ तासात ठोकल्या बेड्या

भोकरदन इसरारखान पठाण :-

लग्नाचे आमिष दाखवून एका असहाय्य विधवा महिलेचा छळ करणाऱ्या तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आणि पोटच्या मुलाला स्वतःचे नाव देण्यास नकार देऊन मारहाण करणाऱ्या एका नराधमाला भोकरदन पोलिसांनी अवघ्या दोन तासांत गजाआड केले आहे. जगदीश भानुदास गायकवाड रा. इब्राहिमपूर ता.भोकरदन असे अटक करण्यात आलेल्या नराधम आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने या नराधमाला २० जून २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

लग्नाचे आमिष दाखवून ७ वर्षे शोषण तक्रारीतून धक्कादायक सत्य उघड

पीडित महिलेने १६ जून २०२६ रोजी भोकरदन पोलीस ठाण्यात धाव घेऊन न्याय मागितला. पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी जगदीश गायकवाड विरोधात गु.र.नं. ३४०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ६४(२), ६४, ६९, ३१८(२), ११५(२), ३५१(२), ३५२ नुसार गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तक्रारीतील माहितीनुसार २०१७ पासून आरोपी जगदीश याने पीडित महिला विधवा असल्याचा गैरफायदा घेतला. तुझ्याशी लग्न करतो असे खोटे आमिष दाखवून त्याने सातत्याने तिच्यावर अत्याचार केले. या संबंधातून पीडितेला एक वर्षाचा मुलगाही झाला. मात्र वासना शमल्यानंतर या नराधमाने रंग बदलला. त्याने पोटच्या मुलाला स्वतःचे नाव देण्यास, तसेच मुलाचे आधारकार्ड व जन्म दाखला काढून देण्यास साफ नकार दिला.

अत्याचार करून बेदम मारहाण; दिली जिवे मारण्याची धमकी!

दि. ५ जून २०२६ रोजी आरोपी पुन्हा पीडितेच्या घरी गेला. मी तुझ्याशी लग्न करतो आणि मुलाला माझे नाव



देतो अशी खोटी आश्वासने देऊन त्याने पुन्हा तिच्यावर अत्याचार केला. मात्र पीडितेने जेव्हा लग्न कधी करणार ? असा जाब विचारला, तेव्हा नराधम जगदीशने आपला खरा चेहरा दाखवला. त्याने पीडितेला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली अत्यंत अश्लील शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची थेट धमकी दिली.

मोबाईल लोकेशन ट्रेस अवघ्या २ तासांत गेम ओव्हर

या घटनेचे गांभीर्य ओळखून भोकरदन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी तात्काळ चक्र फिरवली. त्यांनी पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांना घटनेची माहिती देऊन विशेष तपास पथक तैनात केले.पो.उपनिरीक्षक प्रकाश शेळके, पो.ना. प्रशांत उबाळे, पो.अ. लक्ष्मण रानगाते, शिवाजी जाधव, अर्जुन टेकाळे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाचा वापर करून आरोपीचे मोबाईल लोकेशन ट्रेस केले आणि अवघ्या २ तासांच्या आत आरोपी जगदीश गायकवाडच्या मुसक्या आवळल्या

आरोपी आधीच विवाहित; पोलीस कोठडीत रवानगी

पोलिसांनी केलेल्या तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली, ती म्हणजे आरोपी जगदीश हा आधीच विवाहित आहे! लग्न झालेले असतानाही तो २०१७ पासून पीडितेची फसवणूक करत होता. वैद्यकीय तपासणीत गुन्हा निष्पन्न झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. १७ जून २०२६ रोजी त्याला भोकरदनच्या प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची २० जूनपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास धडाकेबाज अधिकारी सहा.पो.नि. राहुल बांगर हे करत आहेत. भोकरदन पोलिसांनी दाखवलेल्या या सिंघम स्टाईल तत्परतेबद्दल पोलीस अधीक्षक तुषार सिंह संधू यांनी संपूर्ण पोलीस पथकाचे जाहीर कौतुक केले आहे. जनतेतूनही भोकरदन पोलिसांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**बीड - राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी से नि मुख्याध्यापक बी टी बहिर,एड रविंद्र किर्दत,जी एम भोले,डि जी वानखेडे,मंदाताई मस्के व प्रशांत**



**गेवराई - विनोबा ऍप वर नियमित वर्गातील विविध उपक्रम पोस्ट केल्याबद्दल सहशिक्षिका श्रीमती शोभा दळवी यांना तालुकास्तरीय बक्षीस देताना गटशिक्षणाधिकारी नांदूरकर साहेब, शेमे साहेब, पवळ सर आणि संघरक्षित सर. या विनोबा बॅगमध्ये अनेक पेन, पेन्सिल, खोडरबर, पट्टी, वह्या, पेपर, स्मायली स्टिकर, किचन आणि सर्टिफिकेट देवून कौतुक करण्यात आले.**


**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०८१ दि.३०.०९.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आसमा फयाजोद्दीन कादरी, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आसमा फयाजोद्दीन कादरी | स्वतः | १६.१०.१९७८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४४६ दि.२१.११.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **बाजीराव काकासाहेब वावरे, रा.करंजळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | स्वयंभु बाजीराव वावरे | मुलगा | ०३.०९.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५७३ दि.१०.०६.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **दिपक बाळासाहेब धुपे, रा.दहीगव्हाण खु.ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सई दिपक धुपे | मुलगी | ०१.१२.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


पान १ वरुन...

**२६ जून रोजी वीरशैव लिंगायत ...**

पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी तात्काळ नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

मागील १४ वर्षापासून जगद्विवेक प्रतिष्ठान बीडच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार प्रतिवर्षी करण्यात येतो. यावर्षी देखील शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ६०% पेक्षा अधिक गुण घेतले आहेत अश्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांनी जेई, सीइटी, नीट परीक्षेमध्ये पात्र ठरले असतील किंवा स्कॉलरशिप परीक्षेमध्ये, नवोदय परीक्षेमध्ये पात्र ठरलेले असतील अशा विद्यार्थ्यांनी देखील ९४ २२ ७४ ४६ ०५ किंवा ९९ ६० ४६ ३२ ४४ या व्हाट्सअप नंबर वर मार्क्स मेमो, आपला पासपोर्ट फोटो, तसेच आपले पूर्ण नाव, गाव, तालुका, जिल्हा असे टाईप करून पाठवावे. नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांची निवड टक्केवारीनुसार केली जाईल. आणि या विद्यार्थ्यांना रोख रकमेसह सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येईल. त्याचबरोबर ६०% पेक्षा अधिक मार्क्स घेऊन उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या सत्कारास पात्र ठरत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी वरील नंबर वर तात्काळ नोंदणी करून या उपक्रमाला बळ द्यावे असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास विवेक स्वामी, सचिव वैभव विवेक स्वामी,सर्वश्री विश्वस्त सौ वैशाली अशोक पडोळे धर्माबाद, सौ रुपाली श्रीकांत स्वामी लातूर, सौ वनमाला विकास स्वामी, सौ वर्षा वैभव स्वामी,प्रशांत माणिक स्वामी,सतीश गंगाधर स्वामी,विलास स्वामी, अशोक स्वामी, दिलीप स्वामी, चंदाराणी स्वामी सह समस्त येळंबकर स्वामी परिवार यांनी केले आहे.

**मातंग समाजाला...**

समाज कंटक यांना हाताशी धरून टिकेचे बाण सोडत आहेत व आमच्या विरोधात बोलायला लावले आहे. त्यांनी हे लक्षात ठेवावे.हे थांबलं नाही तर २०२९ मध्ये टांगा पलटी करून घोडे फरार केल्याशिवाय हा मातंग समाज गप्प बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

**चोरटी वाळू वाहतूक...**

खेडकर हा वाळू विक्रीचा गोरख धंदा करीत आहे. यापूर्वी चकलांबा येथे कार्यरत असलेल्या आणि बदलून गेलेल्या पोलिस अधिकाऱ्याच्या भागीदारीत त्याचा वाळूच्या

पान १ वरुन...

वाहतुकीसाठी हायवा खुलेआम चालत होता. मात्र चकलांबा येथे नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक निरीक्षक सचिन इंगळे यांनी त्याच्या सहकारी सहकारी सहकारी पोलिसांसह बाळू खेडकर याचा चोरटी वाहतूक करणारा हायवा पकडल्याने पोलिसांनी चांगली कारवाई केल्याची चर्चा होत आहे.या प्रकरणी चकलांबा पोलिस ठाण्यात चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १९०/२०२६ व १९१/ २०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आता ट्रॅक्टरद्वारे वाळू वाहतूक केली जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे. दरम्यान या प्रकरणातील आरोपी फरार असल्याचे सांगण्यात आले.सदर कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे आणि त्यांच्या सहकारी पोलिसांनी केली.

**घरफोडी करणारा ....**

विचारपुस केली असता त्याने बीड मध्येच हिना नगर भागात देखील एक बंद घर फोडल्याचे सांगीतले. पोलीस ठाणे अभिलेख पडताळणी केली असता पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं १२६/२०२६ कलम ३३१(३) बी.एन.एस प्रमाणे नोंद असुन सदरील गुन्हा त्यानेच केल्याचे सांगीतले आहे. सदरील आरोपीकडुन बीड शहरातील २ घरफोडीचे गुन्हे उघड झाले आहेत.

पोलीस ठाणे शिवाजीनगर गुरनं १५५/२०२६ कलम ३३१(३) (४) बी.एन.एस, पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं १२६/२०२६ कलम ३३१(३) बी.एन.एस, तरी आरापीनामे कलीम अलीम शेख, वय ३२ वर्ष, रा दहीफळ ता.जि.बीड याचेकडुन वरील गुन्हा करण्यासाठी वापरात आनलेली दुचाकी, नगदी मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपास कामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करीत आहेत.

सदरील कामगिरी श्रीमती चेतना तिडके, प्रभारी पोलीस अधीक्षक, बीड, श्री. समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार राहुल शिंदे, गोविंद राख, पोलीस अंमलदार आश्पाक सय्यद, मनोज परजणे व चालक नितीनजी वडमारे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केली आहे.

**शिवदुर्गा : शिवसंवाद....**

राज्यसभा खासदार तथा पक्षाच्या प्रवक्त्या ज्योती वाघमारे, राष्ट्रीय सचिव तथा

पान १ वरुन...

राष्ट्रीय प्रवक्त्या शायना एन. सी., उपनेत्या विजया पोटे, प्रिती बंड, संगीता ठोंबरे, कला शिंदे, संपर्कप्रमुख संगीता चव्हाण तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक ,महिला आघाडी जिल्हाप्रमुख डॉक्टर प्रतिभा थोरात व चंद्रकलाताई बांगर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

**पेठ बीड पोलीसांनी....**

पेठ बीड येथील मार्शल यांना डायल ११२ क्रमांकावर मिळालेल्या माहीतीवरुन कुरेशी फंक्शन हॉलच्या समोर एका पत्र्याच्या शेडमध्ये कुठलीही चारा पाण्याची सोय न करता कत्तल करण्याच्या उददेशाने गोवंश जातीचे जनावेर डांबून ठेवले असल्याची माहीती मिळाल्यावर सदरची माहीती पोलीस निरीक्षक निलेश केळे यांना सांगीतल्याबरोबर त्यांनी मार्शल यांना खात्री करण्यासाठी पाठवले. आरोपी नामे मुज्जु इकबाल कुरेशी याचे विरुदध पोलीस अंमलदार दिनकर मुंढे यांचे फिर्यादीवरुन पोस्टेला गुरनं. १९३/२०२६ कलम ३,११, प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० सह कलम ५.९ महाराष्ट्र पशु सरंक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास सहा. फौजदार खेत्रे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलिस अधिक्षक श्री. नवनीत काँवत साहेब, प्र. पोलिस अधिक्षक चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक मा. श्री. समीर शेख, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. वेंकटराम भा.पो.से यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश केळे, सहा. पोलीस निरीक्षक नित्यानद उबाळे, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ बारगळ, सफौ/खेत्रे, पोह/विलास ठोंबरे, पोह चांदणे, पोअं/दिनकर मुंढे, गणेश सानप यांनी केली आहे.

**तुकाई उपसा जलसिंचन....**

विधानपरिषद सभापती प्रा. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत विधान भवनात या दोन योजनांच्या कामांचा आढावा घेण्यात आला.जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह पुणे वन्यजीव विभागाचे उप वनसंरक्षक केशव वाबळे (दूरदृष्यप्रणालीद्वारे), पुण्याचे मुख्य अभियंता नितीन दुसाने, जळगाव येथील तापी गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता धनंजय दाहेदार, नाशिक येथील मृद जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता हरिभाऊ गिते, अहिल्यानगर येथील मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे, यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता डी. वाय. गुळूमकर, नाशिक येथील विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता सु. वि. गांगुर्डे आणि वरिष्ठ अधिकारी तसेच मिरजगावचे सरपंच नितीन खेतमाळीस उपस्थित होते.

# ढगाआड गेलेली पावलं आणि राहिलेल्या आठवणी

पिंपरी पुणे -आपण रोज घाईघाईत घराबाहेर पडतो. काम, जबाबदाऱ्या, वेळेची चिंता... पण घराच्या दारात उभं राहून आपण स्वतःला एक साथा प्रश्न विचारत नाही मी परत येईन याची खात्री आहे का ?'

हा लेख त्या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा नाही, तर तो प्रश्न मनात खोलवर रुजवण्यासाठी आहे...

आपण दररोज कुठे तरी निघतो... कामासाठी, ऑफिसला, प्रवासाला, कोणाला भेटायला...निघताना घाई असते, धडपड असते. वेळेत कामाच्या ठिकाणी पोहोचायची चिंता असते.पण घरी असताना...आपण चिडचिड करतो, रागराग आपल्या आई-बाबांवर, घरच्यांवर काढतो. कामावर जाताना, घराबाहेर निघताना किरकिर करतो, नको ते शब्द बोलतो.

खरंच सांगायचं तर असं वागायला हवं का ? आपण कधी स्वतःला विचारतो का ? आपण परत येणार की नाही, याची काही शाश्वती आहे का ? घरून निघणं खूप सहज असतं... दार ओलांडताना काहीच वाटत नाही. काहीच कल्पना नसते. कारण मनात एक गृहितक असतं आपण परत येणारच आहोत. पण परतणं...ते मात्र देवाच्या कृपेवर अवलंबून असते. आजच्या काळात सुखरूप घरी पोहोचणं हेच सगळ्यात मोठं सौभाग्य आहे.

कारण डोंगराआड गेलेला माणूस परत येतो, पण ढगाआड गेलेला कधीच परत येत नाही....

आपण म्हणतो,माणूस परत येईलच. पण प्रत्येक निघालेला माणूस म्हणून परत येता येईलच असं नसतं...!

काही जण डोंगराआड जातात... तर काही ढगाआड... आणि ढगाआड गेलेला माणूस ना दिसतो, ना सापडतो... तो फक्त आठवणीत उरतो. म्हणूनच घरातून निघताना मन स्वच्छ ठेवा.राग, कटुता, अहंकार दारातच सोडून द्या. कारण कोणासाठी तरी तो शेवटचा पाहिलेला चेहरा असू शकतो...



तेच डोळ्यांत टिपलेलं शेवटचं चित्र असू शकतं. आणि ते शेवटचे शब्द काळजी घे... हेच कदाचित शेवटचं ऐकलेलं वाक्य असू शकतं.

परत येणं आपल्या हातात नाही, पण निघताना माणूस म्हणून जाणं आणि परत येईल अशी आशा देऊन जाणं हे मात्र आपल्या हातात आहे.

कारण...डोंगराआड गेलेला परत येतो, पण ढगाआड गेलेला कधीच परत येत नाही...

म्हणून प्रेमाने वागा, प्रेमाने बोला, नको राग, नको द्वेष, नको अहंकार हे सगळं इथेच राहू द्या. कारण जे सगळं सोडून गेले, ते माणूस म्हणून परत येत नाहीत...राहतात फक्त आठवणी...

घरातून निघताना आई-बाबांच्या पाया पडूनच निघा. त्यांच्या डोक्यावरून फिरणारा हात, त्यांच्या ओठांवरचं आशीर्वादाचं वाक्य आपल्या संपूर्ण दिवसाचं कवच बनतं. त्यानंतर देवाचेही पाया पड़ा, नमस्कार करूनच घराबाहेर पड़ा,

कारण आई-वडिलांचा आशीर्वाद आणि देवाची कृपा हे दोन्ही मिळून आपल्या प्रत्येक पावलावर अदृश्य रक्षण करत असतात.

आजच्या धावपळीच्या आयुष्यात आपण वेळ नाही असं म्हणतो, पण आई-बाबांच्या पाया पडायला लागणारा एक क्षण संपूर्ण आयुष्याला दिशा देऊ शकतो.

मोठ्यांचा आशीर्वाद आपल्या मागे असणं खूप महत्त्वाचं असतं. कारण ज्याच्या मागे आशीर्वाद असतात, त्याच्या पुढे अडचणी जास्त काळ टिकत नाहीत.म्हणून घरातून निघताना घाईपेक्षा आधी आशीर्वाद घ्या.कदाचित परत येणं आपल्या हातात नसेल, पण आशीर्वाद घेऊन निघणं हे मात्र नक्की आपल्या हातात आहे.काही लोक आयुष्यातून निघून जातात, पण त्यांच्या आठवणी कधीच जात नाहीत.....

डोंगराआड गेलेली माणसं परत भेटू शकतात, पण ढगाआड गेलेली माणसं आठवणीतच भेटतात....

लेखिका :
**प्रा. दिपाली नारायण बागनाईक**
प्राध्यापिका,
डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी, पुणे १८

# सुभाष रोडवरील वाहतुक कोंडी, पार्किंग प्रश्नी आ.विजयसिंह पंडित यांच्याकडून तात्काळ दखल

बीड /प्रतिनिधी

शहरातील कायम वरदळीच्या असलेल्या सुभाष रोडवरील वाहतुक कोंडी, अतिक्रमण व पार्किंगच्या समस्यांकडे सुभाष रोड व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आ. विजयसिंह पंडित यांचे लक्ष वेधले. सुभाष रोड असोसिएशनच्या व्यापारी बांधवांनी विविध प्रश्नी आ. विजयसिंह पंडित यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केल्यानंतर वाहतुक कोंडी, पार्किंग समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्याचे निर्देश पालिका प्रशासन, शहर वाहतुक शाखा, बीड शहर पोलीस ठाणे यांना दिले आहेत.



मंगळवार, दि.१६ जून रोजी बीड शहरातील सुभाष रोडवरील व्यापारी असोसिएशनच्या विविध समस्यांबाबत पदाधिकाऱ्यांनी आ. विजयसिंह पंडित यांची भेट घेतली. सुभाष रोडवर कायम वरदळ असते, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात वाहतुकीच्या कोंडीची समस्या या रोडवरील हॉकर्स व डिव्हायडरवर थांबणारे चारचाकी वाहने, मधोमध फेरीवाल्यांमुळे होणारी गैरसोय, चारचाकी वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न तसेच चारचाकी वाहनांच्या अनियंत्रित पार्किंगमुळे व्यापारी व ग्राहकांना होत असलेल्या त्रासाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. व्यापारी बांधवांच्या समस्या ऐकल्यानंतर आ. विजयसिंह पंडित यांनी सकारात्मक भुमिका घेत बीड नगर परिषद, बीड शहर पोलीस ठाणे, बीड शहर वाहतुक शाखा यांच्या प्रमुखांशी संवाद साधला. सकारात्मक भुमिका घेत संबंधित यंत्रणांना आवश्यक ते निर्देश देत सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स मधील रिकाम्या जागेत कायमस्वरुपी पार्किंग व्यवस्था उभारण्याबाबतही उपाय योजना करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. यामुळे भविष्यात सुभाष रोडवरील वाहतुक कोंडी व पार्किंगचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बीडचा लाँग मार्च पुणे जिल्ह्यात दाखल

## उपवर्गीकरण रद्दच्या मागणीसाठी मुंबईकडे कूच

पुणे/प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, या मागणीसाठी आंबेडकरवादी युवकांनी आयोजित केलेला बीड ते मंत्रालय, मुंबई लाँग मार्च बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील टप्पे पूर्ण करून आता पुणे जिल्ह्यात दाखल झाला आहे.

या आंदोलनाचा समारोप २६ जून रोजी मुंबईतील आझाद मैदान व मंत्रालय परिसरात होणार असून, त्यासाठी राज्याच्या विविध भागांतून हजारो आंदोलक सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.यावेळी अजय सरवदे, सिद्धार्थ




शिनगारे यांनी यामागची भूमिका स्पष्ट केली. बीड ते मंत्रालय या लॉग मार्च दरम्यान या मार्चमध्ये शेकडो आंबेडकरी युवक सहभागी झाले आहेत.

# गेवराई पोलीसांनी खुणाच्या गुन्ह्यातील आरोपीस सापळा रचून शिताफीने घेतले ताब्यात

बीड /प्रतिनिधी

पोलीस ठाणे धारूर गुरनं. २३७/२०२६, कलम-१०३(१), ३५१(२), ३५१(३), ३ (५) भा.न्या. संहिता-२०२३ अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे विश्वास उर्फ पोपट दादाराव डोंगरे, वय-४४ वर्ष, रा.बार्शी नाका बीड हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. सदर आरोपी हा पोलीस ठाणे गेवराई हद्दीतील मौजे रांजणी येथे असल्याचे पोनि. किशोर पवार यांना गुप्त माहिती मिळाल्यावरुन सदर माहिती वरिष्टाना देऊन तात्काळी पथक रवाना केले.

सदर पथकाने रांजणी येथे जाऊन मिळालेल्या गुप्त बातमीच्या ठिकाणी रात्री ११.३० वा. चे सुमारास सापळा लावून आरोपीस ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. आरोपीस पोलीस आल्याचा सुगावा लागल्याने आरोपीने अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांनी आरोपीचा पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेतले. आरोपीस पोलीस ठाणे गेवराई येथे आणून सर्व कायदेशिर प्रक्रीया पुर्ण करून पोलीस ठाणे धारूर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाई श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई तथा प्रभारी पोलीस अधीक्षक, बीड, समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, श्रेणीपोउपनि, सुरेश पारधी, साफौ/१०४५ नितीन शिंदे, पोह/५७३ लक्ष्मण जायभाय, पोकॉ/२११२ जितेंद्र ओव्हाळ, पोकॉ/२४१ गोरक्ष डोके, पोकॉ/१००१ महादेव कदम, पोकॉ/४०८ संदीप कांबळे, चापोकॉ/२०२८ राजेंद्र चोरमले, यांनी सदर कारवाईत यांनी सहभाग घेतला.

# मृग नक्षत्र अर्धे कोरडे, आता दुबार पेरणीचे संकट

## एका पावसावर पेरणी करुन शेतकऱ्यांनी पायावर 'धोंडा' पाडला

माजलगाव/प्रतिनिधी

हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने दडी मारल्याने तालुक्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या ओलाव्यावर अनेक शेतकऱ्यांनी कापूस व इतर पिकांच्या पेरण्या उरकून शेतकऱ्याने स्वतःच्या पायावर 'धोंडा' पाडला. मात्र त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने आता पिकांच्या उगवणीवर परिणाम होत असून, दुबार पेरणीचे संकट निर्माण झाल्याने 'धोंडी, घोंडी पाणी दें' म्हणायची वेळ आली आहे. घोंड्याचा महिना संपला, मात्र शेतकऱ्यांच्या नशिबी धोंडा आला आहे.






चंदा हंगामाच्या प्रारंभी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शेतात ओलावा निर्माण होताच अनेकांनी मशागतीची कामे पूर्ण करून पेरणी ससुरुवात केली. विशेषतः तालुक्यात कापूस पिकाची मोठ्या प्रमाणावर पेरणी करण्यात आली. काही शेतकऱ्यांनी पावसाची पुढील खात्री न करता उपलब्ध ओलाव्यावरच बियाणे जमिनीत टाकले. दरम्यान, कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे यांनी पेरणीपूर्वी किमान १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्ला शेतकऱ्यांना दिला होता. जमिनीत पुरेसा ओलाया साचल्यानंतरच पेरणी केल्यास उगवण चांगली होते आणि पिकांना सुरुवातीच्या टप्प्यात अडचणी येत नाहीत, असे विभागाकडून वारंवार सांगण्यात आले होते. मात्र या सूचनांकडे दुर्लक्ष करून अनेक शेतकऱ्यांनी एका पावसावरच पेरणी केल्याचे दिसून आले. मृग नक्षत्र सुरू होऊन अर्धा कालावधी उलटला असतानाही समाधानकारक पाऊस झालेला नाही. उलट काही दिवसांपासून तापमानात वाढ होत असून, कडक उन्हामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. परिणामी पेरणीवरील खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. आता पाऊस लांबल्यास दुबार पेरणी करावी लागू शकते. त्यामुळे आर्थिक भार आणखी वाढणार असल्याची चिंता शेतकरी व्यक्त करत आहेत. आधीच शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नसताना दुबार पेरणीचे संकट ओढवल्यास शेतकऱ्यांची कोंडी होण्याची शक्यता आहे. सध्या शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या असून, चांगल्या पावसाची प्रतीक्षा सुरू आहे. येत्या काही दिवसांत पाऊस झाल्यास पिकांना जीवदान मिळू शकते, अन्यथा दुबार पेरणी अटळ ठाण्याची भीती कृषी क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# निवासी डॉक्टरांच्या मागण्यांवर शासन सकारात्मक - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील सुविधा अधिक सक्षम करणार

मुंबई /प्रतिनिधी

राज्यातील निवासी डॉक्टरांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत त्यांच्या समस्या टप्प्याटप्प्याने सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. कोल्हापूरमध्ये एका आठवड्यात २४ तास वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



निवासी डॉक्टरांच्या सेंट्रल मार्ड संघटनेच्या विविध मागण्यांबाबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत मंत्री मुश्रीफ बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, संचालक पल्लवी सापळे, उपसचिव संदीप ढाकणे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाते; तसेच सेंट्रल मार्ड संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अंबाजोगाई एसआरटी डॉक्टरांच्या विद्यावेतन बाबत कारवाई...

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतना संदर्भातील मुद्द्यावर शासनाने स्थापन केलेल्या समितीमार्फत कार्यवाही सुरू आहे. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांचे विद्यावेतन वेळेवर वितरित करण्यात आले आहे. तसेच सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन आवश्यक ती पावले उचलली जाणार आहेत.

# जिवे मारण्याचा प्रयत्नासह दुहेरी गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीस गेवराई पोलीसांनी सापळा रचून केली अटक

बीड /प्रतिनिधी

पोलीस ठाणे गेवराई गुरनं. ३३६/२०२६, कलम-१०९(१), ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ भा.न्या. संहिता-२०२३ व गुरनं. २८७/२०२६, कलम-११८(१), ११५(२), ३५१(२), ३५१(३), ३५२ भा.न्या. संहिता-२०२३ अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे धनंजय नारायण सरक, वय-२९ वर्षे, रा. बागपिंपळगाव, ता. गेवराई, जि. बीड हा मागील बऱ्याच दिवसांपासून पोलीसांना गुंगारा देऊन फरार होता. हा गुन्हा केल्यापासून फरार होता. सदर आरोपी हा पोलीस ठाणे गेवराई शहरात येत असल्याची माहिती पोनि. किशोर पवार यांना गुप्त माहिती मिळाल्यावरुन सदर माहिती वरिष्टाना देऊन तात्काळी पथक रवाना केले.

सदर पथकाने सापळा लावून आरोपी हा रात्री २०.३० वा. चे सु मारास नवीन बस स्टैंड गेवराई येथून पळून जाण्याच्या तयारीत असतांना बसस्थनकासमोरील गर्दीमधून आरोपीची ओळख पटवून आरोपीस ताब्यात घेऊन आरोपीस पोलीस ठाणे गेवराई येथे आणून सर्व कायदेशिर प्रक्रीया पुर्ण करून पोलीस ठाणे गेवराई गुरनं. ३३६/२०२६, कलम-१०९(१), ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ भा.न्या. संहिता-२०२३ अन्वये दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास अण्णासाहेब पवार, सपोनि. गेवराई हे करत आहेत.

सदर कारवाई श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई तथा प्रभारी पोलीस अधीक्षक, बीड, श्री. समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व श्री. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, सपोनि. समाधान दौड, पोकॉ/२४१ गोरक्ष डोके, पोकॉ/२१०४ ऋषी पोटे, पोकॉ/८१९ रामराजे काकडे, पोकॉ/४०८ संदीप कांबळे यांनी सदर कारवाईत यांनी सहभाग घेतला.

# भोकरद दानापूर मार्गावर काळाचा घाला
# भीषण अपघातात मामा भाचा ठार

## ट्रक मिक्सर पिकअपची समोरासमोर धडक, भायडी गावाजवळ घडली दुर्घटना; २ जण गंभीर जखमी, संभाजीनगरला हलवले

भोकरदन-दानापूर मार्गावर भायडी गावाजवळ मंगळवारी सकाळी काळाने घाला घातला. ट्रक मिक्सर आणि महिंद्रा पिकअपची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात मामा भाचा जागीच ठार झाले, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण तालुक्यात शोककळा पसरली आहे.

मामा-भाच्यावर काळाचा घाला

मृतांमध्ये ज्ञानेश्वर जनार्दन भुतेकर (वय ३०, रा. देहेड) आणि त्यांचा भाचा प्रसाद संतोष शेळके (वय १६, रा. कोळेगाव, ता. जाफराबाद) यांचा समावेश आहे. नात्याने मामा-भाचा असलेले दोघेही एकाच कुटुंबातील होते. घरातील दोन कर्ते तरुण एकाच अपघातात गेल्याने देहेड व कोळेगाव गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या अपघातात मृदुजा गजानन बावस्कर (वय २२) आणि वेदिका संजय शेळके (वय १९) या दोन तरुणी गंभीर जखमी झाल्या आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. जखमींना प्रथम



भोकरदन ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर दोघींनाही छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, महिंद्रा पिकअप दानापूरकडून भोकरदनकडे येत होती, तर समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या सिमेंटच्या ट्रक मिक्सरने पिकअपला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की पिकअपचा अक्षरश चक्काचूर झाला आणि रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता. अपघाताचा आवाज ऐकून भायडी गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांचा तपास सुरू, परिसरात हळहळ

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. ट्रक मिक्सर चालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलीस पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, एकाच घरातील मामा-भाचा गेल्याने देहेड व कोळेगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. गावात स्मशान शांतता पसरली आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली

अकाली निधन झालेल्या ज्ञानेश्वर भुतेकर व प्रसाद शेळके यांना दैनिक समर्थ राजयोग परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली. जखमींना लवकर आराम पडो, हीच ईश्वर प्रार्थना


## हिमालयाच्या कुशीत ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते यांच्याकडून गंगा स्नान; २७ दिवसांच्या आध्यात्मिक प्रवास

पाटोदा -,आजीज शेख

हिमालयाच्या अथांग कुशीत, जिथे निसर्ग आणि आध्यात्म यांचा अद्भुत संगम पाहायला मिळतो, अशा पवित्र स्थानी पाटोद्याचे सुपुत्र ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते यांनी नुकतेच गंगा स्नान करून विशेष आध्यात्मिक अनुभव घेतला.

चारधाम आणि पौराणिक क्षेत्रांची तीर्थयात्रा माऊली ज्ञानोबारायांच्या वचनाचा संदर्भ देत महाराज सांगतात की, हिम पर्वतावर गेल्यावर मानवाचे पाप भस्म होते. याच भावनेतून ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते यांची सध्या चारधाम यात्रा सुरू आहे. या प्रवासात त्यांनी केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री आणि यमुनोत्री या चारही धामांचे दर्शन घेतले आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी चार युगांपासून देव, दानव, मानव आणि ऋषीमुनींनी कठोर तपश्चर्या केली, अशा योग नगरीत त्यांनी उपस्थिती लावली आहे.

केवळ चारधामच नव्हे, तर ज्या



ठिकाणी रावणाने आत्मलिंग प्राप्त करून महादेवाची आराधना केली, त्या पवित्र तुंगनाथ स्थळाचे दर्शन आणि स्पर्श करण्याचा भाग्योदय महाराजांना झाला. यासोबतच, मथुरा येथे गोवर्धन परिक्रमा आणि गोकुळात दहा दिवसांची विशेष परिक्रमा पूर्ण करत त्यांनी आपल्या या तीर्थयात्रेला एक वेगळी उंची दिली आहे.

२६ तारखेला बांगरवाडीत होणार आगमन

महाराजांनी सांगितले की, हा एकूण २७ दिवसांचा एक दीर्घ आध्यात्मिक प्रवास आहे. निसर्गाच्या सानिध्यात, गंगेच्या उगमस्थानी आणि प्राचीन तपभूमींवर केलेल्या या प्रवासाची सांगता आता होणार आहे. या पवित्र प्रवासातून ऊर्जा घेऊन येत्या २६ तारखेला ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते यांचे विठ्ठल धाम क्षेत्र बांगरवाडी येथे आगमन होणार आहे.

त्यांच्या या प्रदीर्घ तीर्थयात्रेमुळे पाटोदा आणि बांगरवाडी परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महाराजांच्या आगमनानंतर त्यांच्या या अनुभवांचे कथन ऐकण्यासाठी भाविक उत्सुक आहेत.



## नांदर; येथील खंडेराय मुर्ती प्राणप्रतिष्ठा कलशारोहण कार्यक्रम उत्साहात संपन्न!

दावरवाडी /प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील नांदर ता पैठण येथे दि ( १७) जुन बुधवारी श्री खंडेराय मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळ्याचे आयोजन महंत भागवतानंद सरस्वती महाराज, ह.भ.प. अंकुश महाराज तळपे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी गावामधुन कलशाची मिरवणूक काढण्यात आली. व तसेच सायंकाळी महाप्रसाद वाटप करण्यात आला. ९ते ११ या वेळेत ह.भ.प. नामदेव महाराज पोकळे यांचे किर्तन, जागरण गोंधळ असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार विलास भुमरे, शिवाजी शुगर चे चेअरमन रविंद्र काळे, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र वाघमोडे, मा.स.शाम तांगडे, माजी सभापती नंदकुमार पठाडे, दावरवाडीचे संरपंच ड डि डि जाधव, पं.स. सदस्य ऊदयसेन काळे, मित्रवर्धन काळे, संरपंच विजय गायकवाड, उपसंरपंच आसमान काळे, माजी उपसंरपंच रेवणनाथ कर्डीले, शाम तांगडे संतोष जबडे यशवंत काळे,मा.प.स.कमलाकर एडके ग्रा.पं.स. प्रविण काळे, कचरु नाचन, शिवाजी मगरे, संदीप काळे, ईश्वर कांबळे, राधाकिसन तळपे, आदींसह गावातील युवक, जेष्ठ नागरिक उपस्थित होते..

# लायसन्ससाठी लाचेची मागणी; एसीबीचा
# सापळा अन् भ्रष्ट अधिकाऱ्याचा खेळ खल्लास

## जालना सार्वजनिक बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता कृष्णा अशोकराव महिंद्रकर ४ हजारांची लाच घेताना रंगेहात जेरबंद

जालना शेख फारुक :-

शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी धडपडणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांच्या स्वप्नांवर भ्रष्टाचाराचा घाला घालणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागातील एका अधिकाऱ्याचा काळा कारभार अखेर उघडकीस आला आहे. लायसन्स मंजुरीसाठी थेट लाचेची मागणी करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.-२ जालना येथील सहाय्यक अभियंता कृष्णा अशोकराव महिंद्रकर वय ४७ यांना ४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एसीबी रंगेहात पकडल्याने जालना शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदाराने सुशिक्षित बेरोजगार योजनेअंतर्गत परवाना लायसन्स मिळवण्यासाठी २९ मे २०२६ रोजी ऑनलाईन अर्ज दाखल केला होता.अर्जाची कागदपत्रे पडताळून प्रमाणपत्र देण्यासाठी आरोपी अधिकाऱ्याने तब्बल ५



लायसन्ससाठी लाच; एसीबीचा सापळा अन् भ्रष्ट अधिकाऱ्याचा खेळ खल्लास कृष्णा महिंद्रकर रंगेहात जेरबंद (PWD जालना, १६ जून २०२६)

हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. शासनाच्या योजनेचा लाभ मिळवण्यासाठीही लाच द्यावी लागणार असल्याचे लक्षात येताच तक्रारदाराने थेट एसीबीकडे धाव घेतली.

तक्रारीची शहानिशा केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. पडताळणीत लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आरोपी अधिकाऱ्याने तडजोडीअंती ४ हजार रुपये स्वीकारण्यास तयारी दर्शविली. यानंतर १६ जून २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.-२ मधील आराखडे व नोंदणी शाखेत एसीबीने नियोजनबद्ध कारवाई करत आरोपीला लाच स्वीकारताना रंगेहात जेरबंद केले.

या कारवाईमुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याऐवजी काही अधिकारी त्या योजनांना भ्रष्टाचाराचे कुरण बनवत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे रोजगाराच्या आशेने धावपळ करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांकडूनच पैशांची मागणी होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

लायसन्ससाठी लाच पण एसीबीचा सापळा पडला भारी भ्रष्ट अधिकाऱ्याचा खेळ अखेर खल्लास अशी चर्चा आता जिल्हाभर रंगू लागली आहे.

आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक शशिकांत महावर, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपअधीक्षक गणेश घायाळ यांच्या नेतृत्वाखालील एसीबीच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

शासनाच्या योजनेवर भ्रष्टाचाराचा डल्ला

सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या योजनेतही लाचेची मागणी होत असल्याचे समोर आल्याने प्रशासनातील भ्रष्ट प्रवृत्ती पुन्हा एकदा उघडी पडली आहे. एसीबीच्या या कारवाईमुळे लाचखोर अधिकाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली असून नागरिकांनीही भ्रष्टाचाराविरोधात पुढे येण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# आभाळ कोरडे शेतकरी होरपळले बारसवाड्यात मोसंबी -ऊस पिके संकटात ४५ अंशांच्या तडाख्यात बळीराजा भाजला

## धरण कोरडे विहिरी तळाला कर्जमाफीच्या मागणीने शेतकऱ्यांचा आक्रोश

अंबड /विशेष प्रतिनिधी

जून महिना अर्धा उलटून गेला, पण आभाळाने अद्यापही बारसवाडा परिसराकडे पाठ फिरवली आहे. वाढत्या उष्णतेने आणि पाण्याच्या भीषण टंचाईने शेतकऱ्यांच्या जिवावर बेतले असून मोसंबी व ऊस पिके अक्षरशः मृत्यूच्या दारात उभी आहेत. तब्बल ४५ अंश सेल्सिअस तापमानामुळे शेतातील हिरवळ करपून जात असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.

बारसवाडा येथील शेतकरी विष्णू शेळके आणि सतीश माळकरी यांच्या शेतातील मोसंबी बागा व ऊस पिके




पाण्याअभावी सुकू लागली आहेत. जमिनीतील ओलावा पूर्णपणे नष्ट झाल्याने झाडांची पाने गळत आहेत तर ऊसाची वाढ खुंटली आहे. दिवसेंदिवस बिकट होत चाललेल्या परिस्थितीमुळे शेतकरी चिंतेच्या गर्तेत सापडले आहेत.

गावालगत असलेल्या गलाठी धरणातील पाणीसाठाही धोकादायक पातळीवर घसरला असून केवळ २५ टक्के पाणी शिल्लक असल्याची माहिती समोर येत आहे. विहिरी आणि बोअरवेल्सची पातळी खालावल्याने शेतीला पाणी देणे अशक्यप्राय झाले आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांनी पिके वाचवण्यासाठी धावपळ सुरू केली असली तरी निसर्गाच्या लहरीपुढे त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरत आहेत.

एकीकडे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी महागडी खते, बियाणे आणि शेती साहित्य खरेदी करून ठेवले आहे, तर दुसरीकडे पावसाअभावी पेरण्या रखडल्या आहेत. आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता दुहेरी संकट उभे ठाकले आहे. पिके वाळत आहेत आणि नवीन हंगामाची सुरुवातही अनिश्चिततेच्या छायेत आहे.

शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कोणतीही अट न घालता दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी जाहीर करावी अशी जोरदार मागणी बारसवाडा येथील शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा वाढत्या उष्णतेचा आणि पावसाच्या दिरंगाईचा फटका शेतकऱ्यांच्या जगण्यावरच बसणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.सध्या बारसवाड्यासह संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे खिळल्या असून कधी बरसणार पाऊस ? हा एकच प्रश्न प्रत्येकाच्या ओठांवर आहे. निसर्गाच्या कृपेची वाट पाहणारा बळीराजा मात्र दिवसेंदिवस हतबल होत चालला आहे.

## चाणक्य इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊंना भावपूर्ण अभिवादन



### स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम,संस्कार व नेतृत्वगुणांची प्रेरणा

घनसावंगी प्रतिनिधी :- हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री,राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त घनसावंगी येथील चाणक्य इंग्लिश स्कूलमध्ये अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम संस्कार, स्वाभिमान आणि नेतृत्वगुणांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात जिजाऊंच्या महान कार्याचा जागर करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी जिजाऊंना विनम्र अभिवादन करत त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली.


यावेळी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांना दिलेले संस्कार,स्वराज्य स्थापनेसाठी केलेले मार्गदर्शन, त्यांची दूरदृष्टी,धैर्य,शौर्य आणि आदर्श मातृत्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. जिजाऊंच्या विचारांतून राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि स्वाभिमानाचे मूल्य आत्मसात करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी जिजाऊंच्या जीवनावर आधारित भाषणे मनोगते आणि घोषवाक्ये सादर करून त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त केला. तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे राजमाता जिजाऊंच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारांमधून प्रत्येक विद्यार्थ्याने आदर्श नागरिक बनण्याची प्रेरणा घ्यावी असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी मुख्याध्यापिका मुक्ता सपाटे, शिक्षिका इमराणा सय्यद, दिक्षा परिहार,मंजुषा कोरडे,दीपा बोराडकर,भाग्यश्री शिंदे,स्वाती उढाण,ज्योती जाधव तसेच शिक्षक रामेश्वर देशमुख, मुशरफ शेख,मानसिंग पाटील, सुधाकर चव्हाण, सचिन आरगडे, ब्रह्मदेव जाधव आणि कृष्णा देवडे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या आदर्शांचा अंगीकार करून शिक्षण, संस्कार आणि राष्ट्रसेवेच्या माध्यमातून समाज घडविण्याचा संकल्प व्यक्त केला. स्मृतिदिनानिमित्त आयोजित हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून उपस्थितांनी त्याचे कौतुक केले.

## आष्टीचे सरपंच मधुकर मोरे यांच्या मातोश्रींचे निधन



आष्टी प्रतिनिधी :-आष्टी येथील सरपंच मधुकर दादा मोरे यांच्या मातोश्री सौ. राणूबाई सहादू मोरे वय ७६ यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, चार नातू व तीन नाती असा परिवार आहे.

त्यांच्या निधनाने मोरे कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्यावर दि.१७ बुधवार रोजी दुपारी ४ वाजता भगवान नगर रोड, आष्टी येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक व ग्रामस्थांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## जागतिक संगीत दिनाच्या निमित्ताने मासिक शास्त्रीय संगीत सभा आयोजन



अंबाजोगाई /प्रतिनिधी

संगीत साधना मंच अंबाजोगाई यांच्या वतीने जागतिक संगीत दिनाच्या निमित्ताने मासिक शास्त्रीय सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेमध्ये पुणे येथील प्रथितयश गायक श्री यश कोल्हापुरे हे आपली गायन सेवा सादर करतील.त्यांना पुणे येथील प्रसिद्ध तबला वादक श्री पुष्कर महाजन तबल्यावर तर संवादिनी वर श्री विश्वजीत धाट साथ करतील. रविवार दिनांक २१ जून रोजी सायंकाळी ठीक साडेसहा वाजता श्री कपिल गणेश मंदिर आदर्श कॉलनी अंबाजोगाई येथे नियोजित या संगीत सभेचा सर्वांनी आवर्जून लाभ घ्यावा असे नम्र आवाहन करण्यात येत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED- 431122 ( MAHARSHTRA ).

# मानव विकासच्या बसेस बंद झाल्याने ग्रामीण मुलींच्या शिक्षणावर विपरीत परिणाम

## वडवणी तालुक्यातील हजारो विद्यार्थिनींच्या शिक्षणावर प्रश्नचिन्ह

वडवणी (प्रतिनिधी):- ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या मानव विकास योजनेअंतर्गत धावणाऱ्या वडवणी तालुक्यातील सर्व अकरा बसेस बंद झाल्याने तालुक्यातील हजारो विद्यार्थिनींच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या मुलींना आता प्रवासाची मोठी अडचण निर्माण झाली असून, शिक्षण घ्यायचे कसे? असा प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे.

ज्या तालुक्यांमध्ये मानव विकास निर्देशांक खुपच कमी आहे, अशा तालुक्यांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मानव विकास योजना मागील अनेक वर्षांपासून राबवली जात होती. यामध्ये बीड जिल्ह्यातील शिरुर कासार व वडवणी या दोन तालुक्यांचा समावेश होता. सरकारच्या या मानव विकास योजनेच्या माध्यमातून वडवणी तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळत होती. या बससेवेचा



आधार घेवून अनेक गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील मुलींनी उच्च शिक्षणाची वाट धरली होती. मात्र आता अचानक ही सेवा बंद झाल्याने नुकत्याच सुरु झालेल्या नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनींच्या शिक्षणात अडथळा निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील अनेक गावांमधून शाळा व महाविद्यालये दूर अंतरावर आहेत. वडवणी तालुक्यातील ग्रामीण व डोंगरी भागात कोणत्याही स्वरुपाची शासकीय वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्याने व खासगी वाहनांचा खर्च परवडत नसल्याने अनेक विद्यार्थिनींना आता शिक्षण सोडण्याची वेळ येण्याची भिती पालक व्यक्त करत आहेत. शासनाने मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याऐवजी प्रवासाची सुविधा बंद करुन त्यांना पुन्हा जुन्या बंधनात ढकलण्याचा प्रयत्न करु नये, अशी भावना पालकांमधून व्यक्त होत आहे. मुलींना शिक्षणाच्या संधी द्यायच्या की पुन्हा चूल आणि मूल याच चौकटीत ठेवायचे? असा सवालही संतप्त पालकांनी यानिमित्ताने उपस्थित केला आहे. मानव विकास योजनेच्या धर्तीवर किमान एसटी महामंडळाच्या बसेस तरी पूर्ववत सुरु करण्यात याव्यात, अशी मागणी आता ग्रामीण भागातून जोर धरत आहे. या प्रश्नावर शासनाने व प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अन्यथा सर्व संतप्त पालक बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देवून घेराव आंदोलन तसेच बेमुदत उपोषण करण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येत आहे. विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा प्रश्न लक्षात घेता शासन व प्रशासनाने तातडीने निर्णय घेवून बससेवा सुरु करावी, अशीही मागणी पालक, विद्यार्थी आणि नागरिकांकडून होत आहे.

**वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरुच - गटशिक्षणाधिकारी राहूल भट्टी**

दरम्यान पूर्वी वडवणी तालुक्यामध्ये मानव विकास योजनेअंतर्गत संपूर्ण तालुक्यातील ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थिनींसाठी एकूण ११ बसेसव्दारे विद्यार्थिनींची घर ते शाळा अशी मोफत प्रवास योजना राबवली जात होती. परंतू यावर्षीचे नविन शैक्षणिक वर्ष दि.१५ जून पासून सुरु झाल्यानंतरही सदरील बससेवा बंद केली असल्याचे राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कळविले. मात्र बसेस बंद झाल्याने या विद्यार्थिनींना शाळेत येण्यासाठी अडचणी येत असून यासंदर्भात विविध शाळा व पालकांनी आमच्याकडेही याबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद व राज्य परिवहन महामंडळाकडे या बसेस सुरु करण्यासंदर्भात देखील लेखी स्वरुपात पाठपुरावा सुरु असल्याची प्रतिक्रिया वडवणीचे गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांनी यावेळी दिली.



### गेवराईतील तय्यब नगर येथे एसटी बसला अधिकृत थांबा देण्याची

## माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांची आगार व्यवस्थापकांकडे मागणी

गेवराई /प्रतिनिधी/ तय्यब नगर आणि परिसरातील विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी एमएसईबी ऑफिस समोर एसटी बसला अधिकृत थांबा मंजूर करावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांनी गेवराई रा.प. महामंडळाच्या आगार व्यवस्थापकांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.तय्यब नगर भागाची लोकसंख्या वेगाने वाढत असून येथून दररोज जिल्हा परिषद उर्दू शाळेचे विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुण, नोकरदार आणि महिला मोठ्या संख्येने शहरात व इतर ठिकाणी ये-जा करतात. विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी शाळा-कॉलेजच्या वेळेत प्रवाशांची मोठी गर्दी असते. मात्र, या भागात अधिकृत बस थांबा नसल्याने नागरिकांना व विद्यार्थ्यांना बस पकडण्यासाठी लांब अंतरावर पायी जावे लागते. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, रात्री-अपरात्री प्रवास करणाऱ्या महिला व वृद्धांची मोठी गैरसोय होत आहे.तय्यब नगर येथे एसटी बसला अधिकृत थांबा मिळाल्यास प्रवाशांचा वेळ वाचेल आणि महामंडळाच्या उत्पन्नातही भर पडेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.प्रमुख मागण्या:अधिकृत थांबा: तय्यब नगर येथे सर्व सामान्य व नियमित फेऱ्या मारणाऱ्या बसेसला अधिकृत थांबा देण्यात यावा.शाळेच्या वेळेत थांबा: सकाळी आणि संध्याकाळी शाळा-कॉलेजच्या वेळेत बसेस येथे आवर्जून थांबवण्यात याव्यात.या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन महामंडळाने तय्यब नगर येथे तात्काळ बस थांबा मंजूर करावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद

शेख निसार, सय्यद बादशाह,लाला तांबुळी, सय्यद रोफ , शेख बाबु,स्थानिक नागरिकांनी केली असून

# कपड्याच्या दुकानासाठी १० लाखांची मागणी

## अंबाजोगाईत विवाहितेचा छळ, सासरच्या चौघांवर गुन्हा दाखल !

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

लग्नात १५ लाख रुपये खर्च करूनही मनासारखा मानपान दिला नाही म्हणून आणि कपड्याचे दुकान टाकण्यासाठी माहेरहून १० लाख रुपये घेऊन ये, या मागणीसाठी मुस्लिम विवाहितेचा अमानुष छळ केल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाईत उघडकीस आली आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या ४ जणांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

✻ संसार वाचवण्याचे सर्व प्रयत्न अपयशी हे प्रकरण गेल्या ६ महिन्यांपासून सुरू होते. पीडित महिला सिमा आक्रम शेख (वय २२) हिचा संसार तुटण्यापासून वाचवण्यासाठी तिचे कायदेशीर सल्लागार ड. पुरुषोत्तम दहिवाडे यांनी मोठे प्रयत्न केले होते

त्यांच्याच सल्ल्याने होते. त्यांच्याच सल्ल्याने हा वाद सामोपचाराने मिटावा म्हणून 'भरोसा सेल' मध्येही मध्यस्थी करण्यात आली. मात्र, सासरच्या मंडळींचा कमालीचा आडमुठेपणा (हटधर्मी) आणि क्रूरतेमुळे समेटाचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. १० लाख रुपये

आणण्यास नकार दिला म्हणून पती आक्रम याने

पीडितेला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच सासू-सासऱ्यांनी पैसे आणले नाही तर तलाक देऊन मुलाचे दुसरे लग्न लावून देऊ अशी धमकी दिली. अखेर २९ मे २०२६ रोजी विवाहितेची अब्रू वेशीवर टांगून तिला घरातून हाकलून देण्यात आले.पीडितेच्या तक्रारीवरून पती आक्रम आस्लम शेख, सासू रुक्कय्या आस्लम शेख, सासरे अस्लम शेख आणि आस्लम शेख आणि दीर मुकरम अस्लम शेख (सर्व रा. गुरुवार पेठ अंबाजोगाई यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) च्या कलम ११५ (२),३(५), ३५१(२), ३५२ आणि ८५ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रुक्मीन खंडू पाचपिंडे करत आहेत. समाजात अशा हुंडापिसाट प्रवृत्तीमुळे आणखी कोणत्या मुलीचे आयुष्य उद्धुस्त होऊ नये, म्हणून नराधमांवर कडक कारवाईची मागणी होत आहे.

## केज महावितरण कार्यालयाचा गलथान कारभार

# दिवसभर वीज पुरवठा खंडीत, शासकीय कार्यालये ठप्प,तक्रार निवारण विभागाचा फोन स्विच ऑफ;संतप्त नागरिकांचा संताप

केज/प्रतिनिधी

स्थानिक महावितरण कार्यालयाच्या ढिसाळ आणि गलथान कारभारा मुळे आज केज शहरासह परिसरात दिवसभर वीज पुरवठा खंडित झाला होता.ऐन कामकाजाच्या दिवशी वीज खंडित झाल्याने केज तालुक्यातील मुख्य शासकीय कार्यालयांचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले,तर दुसरीकडे नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी असलेला तक्रार निवारण विभागा चा फोनच दिवसभर 'स्विच ऑफ' असल्याने ग्राहकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

**शासकीय कार्यालयांना फटका,नागरिक हैराण**

बुधवारी सकाळपासूनच केज शहरातील वीज पुरवठा अचानक खंडित झाला.वीज कधी येईल, याबाबत कोणतीही पूर्वकल्पना महावितरण कडून देण्यात आली नव्हती.यामुळे तहसील कार्यालय,पंचायत समिती,भूमी अभिलेख यांसह विविधबँका आणि शासकीय कार्यालयातील संगणकीय प्रणाली कोलमडली.दूरवरून शासकीय कामासाठी आलेल्या शेकडो नागरिकांना ताटकळत राहावे लागले,तर अनेकांना कामाशिवाय रिकाम्या हाती परत जावे लागले.

**तक्रार निवारण केंद्र बनले 'शो-पीस'**

वीज का गेली आणि ती कधी येणार,याची माहिती घेण्यासाठी जागरूक नागरिकांनी



महावितरणच्या तक्रार निवारण केंद्राशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र,नेहमीप्रमाणे या विभागाचा अधिकृत फोन बंद म्हणजेच 'स्विच ऑफ' करून ठेवण्यात आला होता.अधिकारी आणि कर्मचारी फोन उचलत नाहीत त्यामुळे महावितरणचा मनमानी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.महावितरणचा कारभार पूर्णपणे रामभरोसे झाला आहे.वीज गेल्यानंतर साधा फोन उचलण्याची तसदीही येथील कर्मचारी घेत नाहीत.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची दखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई करावी,अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा वीज ग्राहक यांच्या कडून देण्यात येत आहे.

**व्यापाऱ्यांना आर्थिक फटका**

उन्हाचा कडाका आणि त्यातच दिवसभर वीज नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल झाले. तसेच झेरॉक्स सेंटर्स, छोटे व्यावसायिक, वेल्डिंग दुकाने आणि संगणकावर आधारित व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यापाऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला.

महावितरणच्या या सातत्यपूर्ण ढिसाळ नियोजनामुळे केजमधील नागरिक आणि लोकप्रतिनिधींमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे त्वरित लक्ष देऊन केज येथील कारभारात सुधारणा करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# दुसऱ्याच दिवशी बीड -अंबाजोगाई-लातूर महामार्ग रोखला,शेकडो शेतकरी रस्त्यावर

केज/प्रतिनिधी

क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या बुलढाणा येथील बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी, संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली दि.१७ जून रोजी सकाळी ११वाजता बीड-अंबाजोगाई-लातूर महामार्गावर होळ येथे एक तास चक्काजाम आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहूल खोडसे यांनी सहभागी होऊन पाठिंबा दिला.

सकाळी ११ वाजल्या पासून शेकडो शेतकरी होळ गावाजवळील राज्य महामार्गावर एकत्र आले.महामार्गावर



वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.आंदोलकांनी शेतकरी जिंकणारच, रविकांत भाऊ तुम आगे बढो अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. आंदोलनस्थळी पोहोचलेल्या महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या हस्ते शेतकऱ्यांच्या दहा प्रमुख मागण्यांचे निवेदन देण्यात आले.यावेळी युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. आंदोलन पूर्णपणे शांततेच्या मार्गाने पार पडले.यावेळीजिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला.ते म्हणाले की,काल आम्ही केज तहसील कार्यालयासमोर टायर जाळून निषेध नोंदवला.सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही,तर उद्या सरकारची खुर्ची जळायला वेळ लागणार नाही.गांधीजीं च्या मार्गाने ऐकत नसाल तर शहिद भगतसिंगांचा मार्ग अवलंबावा लागेल. रविकांत भाऊंचा जीव टांगणीला लागला आहे. सरकारने तातडीने सरसकट कर्जमाफी, २०२५ चा खरीप १७५०० रुपये हेक्टरी पिकविमा आणि १०० टक्के नुकसान भरपाई जाहीर करावी.अन्यथा हा लढा आणखी तीव्र करू चक्का जाम आंदोलनात तालुकाध्यक्ष दिलीप लोंढे,अतुल गवळी,सतीश शिंदे, हरिभाऊ आघाव,दिगंबर तपसे,पंडीत शिंदे,सुनील कापरे,भारत धपाटे, सुग्रीव करपे,उमेश गायकवाड,यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात जागतिक रक्तदाता दिन उत्स्फुर्त भाषणस्पर्धा व व्याख्यान कार्यक्रमाने संपन्न



केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक १४ जुन २०२६ रोजी जागतिक रक्तदाता दिन उत्स्फुर्त भाषण स्पर्धा व व्याख्यान कार्यक्रम घेवून संपन्न झाला.रक्ताची कमतरता आणि रक्तदात्यांनी रक्तदान करण्याची गरज या विषयावर ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.प्रमुख पाहुणे म्हणून रावसाहेब जाधव,रमेशराव गायकवाड,ए.बी. गायकवाड,ज्ञानेश्वर गायकवाड,श्रुती पुंड यांची उपस्थिती होती.अध्यक्षस्थानी माजी सरपंच रामराजे गायकवाड हे होते.त्यानंतर उत्स्कुर्त भाषण स्पर्धा घेण्यात आली. यात गौरी ज्ञानेश्वर गायकवाड,शिवराज जाधव,हर्षद गायकवाड, चैतन्य गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, आनंद गायकवाड यांनी सहभाग घेतला.उत्स्फुर्त भाषण स्पर्धेत गौरी गायकवाड यांनी प्रथम तर आनंद गायकवाड यांनी द्वितीय प्राविण्य मिळविले.परिक्षक म्हणून दादासाहेब गायकवाड यांनी काम केले.तसेच प्रथम,द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र वितरण दादासाहेब गायकवाड व डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

# अवैध वाळू उपसा प्रकरणी गेवराईच्या तहसिलदारवर कारवाई का नाही ?

## हा प्रश्न आपण तडीस लावणार - आ.विजयसिंह पंडित

बीड (प्रतिनिधी) घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करण्याच्या नावाखाली गोदावरी नदीपात्रात लाखो ब्रास वाळूचे अवैध उत्खनन होत असून या अवैध वाळू उपशाची एसआयटी कडून चौकशी करावी अशी मागणी आपण केली होती, त्यानंतर जिल्हा प्रशासनाने थातूरमातूर कारवाई केली. गेवराई तहसिलदारांच्या नेतृत्वात गोदावरी नदीपात्रात सुमारे १०० कोटी रुपयांचे वाळू उपसा सिंडीकेट चालवणारे मुख्य आरोपी या प्रकरणातून बाजूला सारून इतर लोकांवर जिल्हा प्रशासनाने कार्यवाही केली असून आपण हे प्रकरण तडीस जाईपर्यंत लावून धरणार आहोत. येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात आपण हा प्रश्न उपस्थित करणार असून वेळ पडली तर न्यायालयात दाद मागू अशी प्रतिक्रिया आ. विजयसिंह पंडित यांनी पत्रकारांशी बोलताना दिली

श्री क्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथून घरकुल बांधकामाच्या नावावर गोदावरी नदीपात्रातून सुरु असलेल्या अवैध वाळू उपसा प्रकरणी आ. विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, या प्रकरणात सुमारे १०० कोटी रुपयांचे तहसिलदारांच्या नेतृत्वात महसुल व पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांचे वाळू माफियांसह सिंडीकेट कार्यान्वित असल्याचे सिद्ध होताच जिल्हा प्रशासनाने कारवाई केली मात्र या कारवाईतून सिंडिकेट चालवणारे मुख्य आरोपी दूर ठेवण्यात आल्याचा आरोप आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी केला.

अवैध वाळू उपसा करणाऱ्या तहसील आणि त्यांच्या कंपनीच्या विरोधात आपण ही मोहीम यापुढेही चालवणार असून हा प्रश्न तडीस जाईपर्यंत आपण याची पाठ सोडणार



नसल्याचे सांगून येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात आपण हा प्रश्न उपस्थित करणार असून वेळ पडली तर न्यायालयात दाद मागणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# ज्ञान मंदिरांमध्ये पहिल्याच दिवशी चिमुकल्यांचा किलबिलाट

## वडवणी तालुक्यात शाळांमध्ये प्रवेशोत्सव उपक्रम उत्साहात साजरा

वडवणी (प्रतिनिधी):- उन्हाळी सुट्टीनंतर शाळेची घंटा पुन्हा एकदा वाजली आणि वडवणी तालुक्यातील ज्ञान मंदिरांमध्ये पहिल्याच दिवशी चिमुकल्या विद्यार्थ्यांचा किलबिलाट ऐकायला मिळाला. नविन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त वडवणी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद तसेच खाजगी शाळांमध्ये प्रवेशोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला व नवगतांचे मोठ्या हर्षोल्हासात स्वागत करण्यात आले.

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेच्या पहिल्याच दिवशी नवगत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीतील नव्या विद्यार्थ्यांचे तर खाजगी शाळांमध्ये इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची बैलगाडी व ट्रॅक्टरमधून आकर्षक मिरवणूक काढून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी कार्यालय वडवणीच्या वतीने कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी राहूल भट्टी यांच्या नियोजन व मार्गदर्शनाखाली त्यांच्यासह तालुकास्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांनी विविध शाळांना भेटी देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे व गणवेशाचेही वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षक, पालक व ग्रामस्थांमध्ये शिक्षणाबध्दल सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक शाळा क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनीही शाळांना भेटी देवून नवगत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहावे,



गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, शिक्षकांचा उत्साह आणि पालकांचा सहभाग यामुळे संपूर्ण तालुक्यात शिक्षणाचा भव्य उत्सवच साजरा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शाळेशी नाते अधिक घट्ट करण्याचा आणि शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा पुर्णपणे प्रयत्न करण्यात आला.

# पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंगमध्ये पहिल्याच दिवशी ६५ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची विक्रमी नोंद

## दर्जेदार व मोफत शिक्षणामुळे पालकांचा वाढता विश्वास

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षणाच्या क्षेत्रात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि संस्कारमय शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, टाकळसिंग (ता.आष्टी) या शाळेने नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेत पहिल्याच दिवशी तब्बल ६५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेत विक्रमी उच्चांक नोंदविला असून परिसरातील पालकांचा शाळेवरील वाढता विश्वास यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. शाळेच्या वतीने परिसरातील ११ गावांतील विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून, शैक्षणिक गुणवत्ता, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणारी शिक्षणपद्धती यामुळे या शाळेकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची तयारी, शिस्त, संस्कार आणि गुणवत्तेचा विचार करून त्यांना मोफत प्रवेश देण्याची अभिनव संकल्पना शाळेत राबविण्यात येत आहे.



शाळेमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सेमी इंग्रजी आणि सीबीएसई धर्तीवरील दर्जेदार शिक्षण पूर्णतः मोफत उपलब्ध करून दिले जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरांप्रमाणे आधुनिक शिक्षण मिळावे यासाठी शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण, रोबोटिक्स व कोडिंग शिक्षण, डिजिटल शिक्षण, स्मार्ट क्लासरूम सुविधा, प्रात्यक्षिकांवर आधारित अध्यापन अशा आधुनिक शैक्षणिक साधनांचा लाभ दिला जात आहे. याशिवाय वर्षभर विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान व मार्गदर्शन सत्रे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विशेष कार्यक्रम, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठीही शाळा सातत्याने प्रयत्नशील आहे.

पीएम श्री योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना अनेक विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामध्ये मोफत दोन गणवेश, शूज, राज्यांतर्गत तसेच इतर राज्यांमध्ये शैक्षणिक सहली, वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक उपचारांची सुविधा, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलती व आवश्यक शैक्षणिक सहाय्य यांचा समावेश आहे. शाळेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला दिले जाणारे सर्वोच्च प्राधान्य. विद्यार्थी घरातून शाळेसाठी निघाल्यापासून ते पुन्हा घरी पोहोचेपर्यंत त्यांच्या सर्वांगीण काळजीची जबाबदारी शाळा पार पाडत आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रीय मूल्ये रुजविण्याचे कार्यही सातत्याने केले जाते.

ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, टाकळसिंगची आदर्श शाळा म्हणून निवड केली आहे. या निवडीमुळे चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी, विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी तसेच आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अधिक बळ मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

याबाबत माहिती देताना शाळेचे मुख्याध्यापक महेशकुमार शिंदे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच नव्हे तर संस्कार, गुणवत्ता, कौशल्य विकास आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे सर्वसमावेशक शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. परिसरातील सर्व पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश लवकरात लवकर निश्चित करून या शैक्षणिक सुविधांचा लाभ घ्यावा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाच्या नव्या संधी निर्माण करणारी आणि गुणवत्तेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण करणारी पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, टाकळसिंग ही खऱ्या अर्थाने आमची शाळा, आमचा अभिमान ठरत असल्याची भावना पालक आणि ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.






# पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी येथे भव्य ॲक्रिलिक कमानीचे आ.सुरेश धस यांच्या शुभहस्ते लोकार्पण

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या पीएमश्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी येथे नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य ॲक्रिलिक प्रवेश कमानीचा लोकार्पण सोहळा शुक्रवार दि. १९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याचे उद्घाटन आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा लोकनेते, मराठवाडा भूषण मा. श्री सुरेश (आण्णा) धस यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक, पालक, माजी विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते तसेच शिक्षणप्रेमींना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर आकर्षक आणि आधुनिक स्वरूपाची ॲक्रिलिक कमान उभारण्यात आली असून त्यामुळे शाळेच्या सौंदर्यात भर पडली आहे. या कमानीमुळे शाळेची ओळख अधिक भव्य आणि आकर्षक स्वरूपात निर्माण झाली आहे. विद्यार्थिनींमध्ये शाळेविषयी अभिमानाची भावना निर्माण होण्यासही या उपक्रमाची मदत होणार असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

ही कमान श्री. प्रकाश केरू आजबे व श्री. संजय केरू आजबे (संचालक, आभा प्रतिष्ठाण) यांनी आपल्या कुटुंबीयांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणगी स्वरूपात उभारून दिली आहे. स्वर्गीय अलका केरू आजबे आणि स्वर्गीय केरू जिजाबा आजबे यांच्या पवित्र स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असून त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक प्रेरणादायी उदाहरण मानले जात आहे.

शाळेच्या परिसरात उभारण्यात आलेली ही कमान केवळ प्रवेशद्वार नसून विद्यार्थिनींना शिक्षण, संस्कार आणि उज्ज्वल भवितव्याच्या दिशेने प्रेरणा देणारे प्रतीक ठरणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या या कमानीवर शाळेची माहिती, शैक्षणिक संदेश आणि संस्थेची ओळख प्रभावीपणे दर्शविण्यात आली आहे.

पीएमश्री योजनेअंतर्गत शाळेमध्ये विविध भौतिक सुविधा, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ही आकर्षक कमान उभारण्यात आली असून शाळेच्या प्रगतीच्या वाटचालीतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या लोकार्पण सोहळ्यासाठी मुख्याध्यापक पीएमश्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, तसेच अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती यांनी नागरिकांना सप्रेम निमंत्रण दिले आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

शिक्षण क्षेत्रातील विकासकामांना समाजातील दानशूर व्यक्तींचे सहकार्य लाभत असल्याचे हे आणखी एक उदाहरण असून, या कमानीमुळे शाळेची ओळख अधिक उंचावणार असल्याची भावना पालक व नागरिकांकडून व्यक्त होत आहे. विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

## सायकड-जगताप परिवारात मंगलमय वातावरण

# जय आणि रागिणी यांच्या शुभविवाहाचा सोहळा २४ जून रोजी संपन्न होणार

## लग्न सोहळ्यास उपस्थित राहावे-अरुण सायकड

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) दोन कुटुंबांचे स्नेहबंध, दोन मनांचे पवित्र मिलन आणि दोन संस्कारसमृद्ध घराण्यांचे एकत्र येणे हा प्रत्येक विवाह सोहळ्याचा खरा अर्थ असतो. अशाच आनंददायी आणि मंगलमय वातावरणात आष्टी येथील सायकड परिवार आणि लातूर येथील जगताप परिवार यांच्यातील शुभविवाह सोहळा मोठ्या उत्साहात व पारंपरिक धार्मिक विधींनी संपन्न होणार आहे. चिरंजीव अजय अरुण सायकड आणि चि.सौ.कां. रागिणी हिरालाल जगताप यांचा विवाह बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजी संपन्न होत असून या सोहळ्याबाबत नातेवाईक, मित्रपरिवार आणि शुभचिंतकांमध्ये विशेष उत्सुकता दिसून येत आहे.



चिरंजीव अजय हे कै. सिताबाई व कै. पोपटराव आवबा सायकड यांचे नातू तसेच सौ. वनिता आणि श्री. अरुण पोपटराव सायकड यांचे द्वितीय चिरंजीव आहेत. शिक्षण, संस्कार, सामाजिक जाणीव आणि कुटुंबातील ज्येष्ठांचा आदर या गुणांमुळे अजय यांनी आपल्या कुटुंबात आणि मित्रपरिवारात वेगळी ओळख निर्माण केली आहे. तर चि.सौ.कां. रागिणी या सौ. कमल व श्री. त्रिंबक जगताप यांची नात तसेच सौ. राधिका आणि श्री. हिरालाल त्रिंबक जगताप यांची ज्येष्ठ सुकन्या आहेत. सुसंस्कृत विचार, नम्र स्वभाव, कौटुंबिक मूल्ये आणि शिक्षण यांचा सुंदर संगम असलेल्या रोहिणी यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांना आपलेसे वाटणारे आहे. त्यामुळे या विवाहामुळे दोन कुटुंबांमधील नाते अधिक दृढ होणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या नवदाम्पत्याचा शुभविवाह बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजून २९ मिनिटांनी शुभमुहूर्तावर संपन्न होणार आहे. विवाहासाठी मोरेश्वर लॉन्स, गणपती मंदिराजवळ, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड हे प्रशस्त आणि आकर्षक स्थळ निश्चित करण्यात आले आहे. विवाहस्थळी धार्मिक विधी, वधू-वरांचे स्वागत, आशीर्वाद समारंभ तसेच पाहुण्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून विवाह सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

विवाहपूर्व आयोजित करण्यात आलेला हळदी समारंभ मंगळवार, दि. २३ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता विवाहस्थळीच पार पडणार आहे. या कार्यक्रमात पारंपरिक गीते, कौटुंबिक स्नेहसंमेलन आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमुळे उत्सवाचे वातावरण निर्माण होणार आहे. नातेवाईक आणि मित्रपरिवाराच्या उपस्थितीत रंगणारा हा कार्यक्रम विवाह सोहळ्याची रंगत आणखी वाढविणार आहे.

सायकड आणि जगताप ही दोन्ही कुटुंबे आपल्या सामाजिक बांधिलकी, धार्मिक परंपरा आणि समाजातील सकारात्मक सहभागासाठी परिचित आहेत. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत दोन्ही कुटुंबांनी समाजात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. त्यामुळे या विवाह सोहळ्याकडे केवळ कौटुंबिक कार्यक्रम म्हणून नव्हे, तर दोन प्रतिष्ठित कुटुंबांच्या स्नेहबंधाचा उत्सव म्हणून पाहिले जात आहे. विवाहाच्या निमित्ताने आष्टी, बीड, लातूर तसेच परिसरातील अनेक मान्यवर, नातेवाईक, मित्रमंडळी आणि शुभचिंतक उपस्थित राहणार असून नवदाम्पत्याला शुभाशीर्वाद देणार आहेत. विवाहस्थळी पारंपरिक सजावट, स्वागत कमानी, प्रकाशयोजना आणि पाहुणचार यामुळे सोहळ्याला अधिक भव्यता प्राप्त होणार आहे. श्री. अरुण सायकड चेअरमन, श्री. संदिपान सायकड, श्री. इंजि. रोहित सायकड व समस्त सायकड परिवार यांनी सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, हितचिंतक व शुभेच्छुकांना या मंगल सोहळ्यास उपस्थित राहून नवदाम्पत्यास शुभाशीर्वाद देण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले आहे.

दोन जीवांच्या नव्या संसाराची ही मंगल सुरुवात सुख, समृद्धी, आनंद, आरोग्य आणि यशाने परिपूर्ण होवो, अशा भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहेत. अजय आणि रागिणी यांच्या भावी वैवाहिक जीवनासाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत असून हा विवाह सोहळा परिसरात आनंदाचा आणि उत्साहाचा विषय ठरत आहे. चिरंजीव अजय अरुण सायकड व चि.सौ.कां. रोहिणी हिरालाल जगताप यांना भावी वैवाहिक जीवनासाठी हार्दिक शुभेच्छा.

# सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

## दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण करण्यासाठी सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयात प्रवेशोत्सव, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पाचवीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे फुलांची उधळण करून जल्लोषात स्वागत करण्यात आले, तर दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. उन्हाळी सुट्टीनंतर शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरावा या उद्देशाने विद्यालय प्रशासनाने विशेष नियोजन केले होते. शाळेच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. नवीन पुस्तके, नवीन ध्येय आणि नवीन स्वप्नांसह शैक्षणिक वर्षाची सुरुवात करताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्सुकता पाहायला मिळाली.यावेळी दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावणारी मुस्कान सलीम शेख, द्वितीय क्रमांक मिळवणारी ऋतुजा दत्तो जगताप, तृतीय क्रमांकाची मानकरी सृष्टी लहू राजपुरे तसेच चौथा क्रमांक मिळवणारे साई दादासाहेब गवारे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे सन २००३ च्या दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी दिलेली शाळेला अनोखी भेट. आपल्या शालेय जीवनाच्या आठवणी जपत या माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी दहा हजार रुपये किमतीची साऊंड सिस्टिम भेट दिली. या योगदानामुळे विद्यालयातील विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम अधिक प्रभावीपणे आयोजित करता येणार आहेत.यावेळी माजी विद्यार्थी शहादेव गवारे, आदिनाथ भगत, महादेव भोसले, नवनाथ भोसले, बाळासाहेब भगत, शंकर भगत, बंडू खिलारे, गोवर्धन खिलारे, देवदास गवारे, कृष्णा खिलारे, रमेश खिलारे, सुधीर भोसले, उद्धव भोसले, उद्धव खिलारे, अरुण वाघमारे, दीपक भोसले, गणेश राऊत, गोविंद लोखंडे, छत्रगुण जगताप, हरीश सातपुते, श्रीकांत चौधरी, विठ्ठल भोसले आणि ज्ञानेश्वर खिलारे यांनी शाळेला भेट देत आपल्या शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांशी संवाद साधत जुन्या आठवणींना उजाळा दिल्याने वातावरण भावनिक झाले होते.कार्यक्रमात बोलताना विद्यालयाचे मुख्याध्यापक साईनाथ बोडखे सर यांनी पाचवीच्या नवागत विद्यार्थ्यांचे, दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच २००३ च्या माजी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त आणि गुणवत्ता यांनाही विद्यालयात तितकेच महत्त्व दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास जगताप ताई, गवारे ताई, राजपुरे ताई, मुख्याध्यापक साईनाथ बोडखे सर, ढोले सर, धोंडे सर, हाके सर, हजारे सर, विष्णू मामा, राजगुरू राऊत मामा, खिलारे मॅडम तसेच गावातील अनेक मान्यवर ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत, गुणवंतांचा गौरव आणि माजी विद्यार्थ्यांची शाळेप्रती असलेली आत्मीयता यामुळे सुदर्शन विद्यालयातील हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# आईच्या कष्टांचे चीज; आदिनाथ डोंगरेची एमएच-सीईटीमध्ये ९९.०१ पर्सेंटाईलसह घवघवीत यश

## वडिलांच्या निधनानंतरही खचला नाही; आदिनाथ डोंगरेने मिळवले एमएच-सीईटीमध्ये ९९.०१ पर्सेंटाईल

किनवट , दि. १७ (प्रतिनिधी) : तालुक्यातील बेल्लोरी धानोरा येथील विद्यार्थी आदिनाथ श्रीधर डोंगरे याने एमएच-सीईटी (अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा) मध्ये ९९.०१ पर्सेंटाईल गुण प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशामुळे परिसरातून त्याचे कौतुक होत आहे. आदिनाथ हा ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी असून त्याने इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतचे संपूर्ण शिक्षण स्थानिक स्तरावर पूर्ण केले. विशेष म्हणजे, कोणत्याही प्रकारचे कोचिंग क्लास किंवा खासगी शिकवणी न लावता केवळ जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर त्याने हे यश मिळवले आहे. आदिनाथ इयत्ता दहावीत असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यामुळे कुटुंबावर मोठे संकट कोसळले. घरातील आर्थिक परिस्थिती नाजूक असून शेती हेच कुटुंबाचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. अशा परिस्थितीत आईने घेतलेल्या अथक परिश्रमांचे चीज आदिनाथने आपल्या यशातून केले आहे. त्याच्या या यशामागे आईची मेहनत, त्याग आणि प्रेरणा महत्त्वाची ठरल्याचे बोलले जात आहे.

भविष्यात राज्यातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन सक्षम अभियंता बनायचे आदिनाथ चे स्वप्न आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्याचे हे यश प्रेरणादायी ठरत असून सर्व सुविधा उपलब्ध असूनही अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्याच्याकडून प्रेरणा घेण्याची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे. आदिनाथ डोंगरे यांच्या या यशाबद्दल आमदार भीमराव केराम, भाजप नेते सुधाकर भोयर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, ज्येष्ठ नेते सोपानराव केंद्रे, केंद्रीय जनजाती आयोगाचे गोवर्धन मुंडे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पुरसिंग राठोड, भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, विश्व हिंदू परिषदेचे अनिरुद्ध केंद्रे, ओबीसी नेते बाबुराव केंद्रे, शिवसेना तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे पाटील, माजी उपसभापती श्रीराम कांदे, प्रा. विभीषण पाळवदे, प्रा. गोवर्धन लांब, ड. रमण जायभाये, आत्माराम मुंडे पाटील, मुक्तीराम घुगे, युवा नेते ज्ञानेश्वर दहिफळे, संचालक संजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे श्यामसुंदर केंद्रे, रामदास फड, विवेक केंद्रे, विनायक मुसळे, समीर जायभाये, योगेश जायभाये यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. आदिनाथ च्या या यशामुळे बेल्लोरी धानोरा परिसरासह संपूर्ण किनवट तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# स्वारातीम विद्यापीठात १९ जून रोजी 'राष्ट्रीय वाचन दिन' आणि विद्वत व्याख्यानाचे आयोजन

## ज्ञान स्रोत केंद्रात 'वाचन संस्कृतीची बदलती रूपे' या विषयावर होणार मंथन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

भारतातील ग्रंथालय चळवळीचे जनक पी. एन. पणीकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या 'ज्ञान स्रोत केंद्रा'त शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६ रोजी 'राष्ट्रीय वाचन दिन' समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने ग्रंथ, ग्रंथालये व वाचन प्रेमींसाठी एका विशेष विद्वत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान संपन्न होणार असून, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी अभ्यासक व व्याख्याते डॉ. महेश जोशी हे 'वाचन संस्कृतीची बदलती रूपे' या अत्यंत महत्वपूर्ण व समकालीन विषयावर व्याख्यान पुष्प गुंफणार आहेत. बदलत्या डिजिटल युगात वाचनाचे स्वरूप आणि त्याचे महत्त्व यावर ते प्रकाश टाकतील. हा कार्यक्रम शुक्रवार, दि.१९ जून, २०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता विद्यापीठाच्या 'ज्ञान स्रोत केंद्र' (मध्यवर्ती ग्रंथालय) येथे आयोजित करण्यात आला आहे.




या कार्यक्रमास विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचे सन्माननीय सदस्य, संवैधानिक अधिकारी, संकुलांचे संचालक यांची उपस्थिती लाभणार आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक, ग्रंथपाल, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, संशोधक विद्यार्थी, परिसरातील नागरिक आणि ग्रंथप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर डी. पवार आणि ज्ञान स्रोत केंद्राचे प्र. संचालक डॉ. जगदीश एन. कुलकर्णी यांनी केले आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहपूर्वक संपन्न

## गणितीयशास्त्र संकुलांतर्गत 'अनंत क्लब'चे आयोजन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या गणितीयशास्त्र संकुल व त्यांच्याशी संलग्न 'अनंत क्लब' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माजी विद्यार्थी स्नेहमेळावा दि.१४ जून, २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व सौहार्दपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यास प्रथम बॅच (२००९-१०) विविध बॅचमधील एकूण ७८ माजी विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी बहुतांश माजी विद्यार्थी जुन्या बॅचमधील होते. उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी हा स्नेहमेळावा आपल्यासाठी अत्यंत अविस्मरणीय व आनंददायी असल्याचे मत व्यक्त केले. दीर्घकाळानंतर एकत्र आलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील सुखद आठवणींना जिवंत केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, तर आयक्यूएसीचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी व संकुलाच्या संचालिका डॉ. रुपाली जैन यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

संकुलाच्या संचालिका डॉ. रुपाली जैन यांनी स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेसच्या आजवरच्या प्रगतीचा आढावा घेतला. संकुलाची शैक्षणिक परंपरा, संशोधनातील यश, तसेच विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करताना त्यांनी या समृद्ध परंपरेवर अभिमान व्यक्त केला. माजी विद्यार्थ्यांचे योगदान संकुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी असून, त्यांचा संकुलाशी असलेला संवाद अधिक दृढ राहावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

विविध बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रातील अनुभव व कामगिरीची माहिती उपस्थितांसमोर मांडली. विशेष म्हणजे, संकुलाच्या पहिल्या बॅच (२००९-१०) मधील माजी विद्यार्थीही या मेळाव्याला उपस्थित होते, तसेच २०२१-२२ पर्यंतच्या नवीन बॅचमधील विद्यार्थीही सहभागी झाले होते. अनेक वर्षांनंतर जुन्या मित्र-मैत्रिणी परस्परांना भेटल्याने संपूर्ण संकुल परिसर आनंद व आपुलकीने भरून गेला होता.

यामध्ये डॉ. जे.डी .माशाळे ( पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) निखिल बासटवार (सांख्यिकी अधिकारी, नियोजन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड), अफजल शेख (सांख्यिकी अधिकारी, आरोग्य विभाग, लातूर), रोहिणी मोरे (संशोधिका, व्हीआयटी विद्यापीठ, आंध्र प्रदेश), सय्यद जलील (सहायक प्राध्यापक, हिमायतनगर), सुनील क्षीरसागर (संशोधक, व्हीआयटी विद्यापीठ, आंध्र प्रदेश), संदीप जाधव (उद्योजक, पुणे), कपिल भद्रे (एसएएस, आदित्य बिर्ला, मुंबई), संभाजी शिंदे (प्रशिक्षण केंद्र, धर्माबाद), दिव्या शिंदे (मॅनेजर, जनरल इन्शुरन्स कंपनी, गव्हर्मेंट ऑफ इंडिया), अजय कदम (सांख्यिकी अधिकारी, आरोग्य विभाग, हिंगोली), प्रतिमा घनसावद, शितल कौर (शिक्षक, जिल्हा परिषद नांदेड) यांचा समावेश होता. त्यांनी संकुलातील आपले दिवस, आत्मीय मैत्री व येथून मिळालेली संस्कारांची शिदोरी यांच्या आठवणी भावपूर्ण रीतीने व्यक्त केल्या.



त्यानंतर आयक्यूएसीचे संचालक व सहयोगी प्राध्यापक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी माजी विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन आठवणींवर आधारित विशेष चित्रफीत (ल्युमनी मेमरीज व्हिडिओ) सादर केली. जुन्या क्षणचित्रांमुळे सर्व आठवणी पुन्हा सजीव झाल्याने अनेकांच्या डोळ्यात अश्रू आले.

विद्यापीठाचे कुलसचिव व संकुलाचे माजी संचालक डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी आपल्या मनोगतात संकुलाशी असलेले ऋणानुबंध व्यक्त केले. संकुलाचे सुरुवातीचे दिवस अत्यंत कष्टदायक होते; संचालक म्हणून सुमारे दहा वर्षांचा प्रवास तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून पार पाडलेली जबाबदारी त्यांनी विशद केली. एकेकाळी व्याख्यानासाठी एलसीडी प्रोजेक्टरही बाहेरून आणावा लागत अशा प्रतिकूल परिस्थितीतून संकुलाने सेट, नेट व गेट परीक्षांमध्ये उल्लेखनीय प्रगती साधली. संध्याकाळच्या नेट-सेट कोचिंग व विविध कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावल्याचे त्यांनी विशेष नमूद केले. स्नेहमेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी 'अनंत क्लब'चे आभार मानले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी माजी विद्यार्थी ही कोणत्याही शैक्षणिक संस्थेची खरी ओळख व बलस्थान असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेच्या विकास व प्रतिष्ठेत माजी विद्यार्थ्यांचे योगदान मोलाचे असून, त्यांनी आपल्या मातृसंस्थेशी असलेले ऋणानुबंध कायम जपावेत, असे आवाहन त्यांनी केले. ज्ञान, संशोधन व गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या जोरावर विद्यापीठ नव्या उंची गाठत असून, या प्रवासात माजी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांचे मार्गदर्शन विद्यमान विद्यार्थ्यांना द्यावे व त्यांना प्रोत्साहित करून उज्ज्वल भविष्यासाठी पाठबळ उभे करावे, असेही ते म्हणाले. गणितीय शास्त्र संकुलाच्या समृद्ध परंपरेवर अभिमान व्यक्त करताना त्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रम सचिव डॉ. उषा सांगळे यांनी स्नेहमेळाव्याची उद्दिष्टे स्पष्ट केली. माजी विद्यार्थ्यांचे संकुलाशी असलेले नाते अधिक दृढ करणे, त्यांच्या अनुभव व मार्गदर्शनाचा लाभ विद्यमान विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे तसेच परस्पर स्नेह व ज्ञानाची देवाणघेवाण वाढविणे हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. आयोजनासाठी करण्यात आलेल्या परिश्रमांचाही आढावा त्यांनी यावेळी घेतला.

एकट्याने आपण थोडे साध्य करू शकतो; परंतु एकत्रितपणे आपण मोठी कामे करू शकतो या विचाराचा प्रत्यय देणारा हा स्नेहमेळावा सर्व उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन गोविंद सूर्यवंशी व कल्याणी कळसकर यांनी केले. या यशस्वी कार्यक्रमासाठी संकुलातील प्राध्यापक, कर्मचारी, संशोधक विद्यार्थी व अनंत क्लबच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी कार्यक्रम सचिव डॉ. उषा सांगळे , डॉ. अनिकेत मुळे, डॉ. नितीन दारकुंडे व उदय दिव्यवीर यांच्यासह प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड कर्मचारी संघटना कर्मचा-यांनी कार्यालयासमोर निदर्शने

नवीन नांदेड- नांदेड़ प्रादेशिक परिवहन कार्यालयात विविध मागण्यासाठी कर्मचारी यांचे दिनांक १६ जून पासून बेमुदत संप सुरू आहे. सदर संपाच्या आज दुसऱ्या दिवशी बेमुदत संपास नांदेड जिल्हा मध्यवर्ती कर्मचारी संघटनेने पाठिंबा दिला असल्याचे पत्र अध्यक्ष नरमवार यांना दिले आहे.



कार्यालया समोर उपस्थित असलेल्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचारी यांना नरमवार यांनी मार्गदर्शन करून यावेळी मोटर वाहन विभाग संघटनेच्या मागण्या ह्या रास्त असून यामध्ये शासनाला कोणताही आर्थिक भुर्दंड नसतानाही कर्मचारी यांच्या मागण्या शासना कडून विना विलंब मंजूर केल्या पाहिजे. पाठिबा देण्यासाठी मध्यवर्ती संघटनेचे साले व सरोदे उपस्थित होते.प्रादेशिक परिवहन कार्यालय कर्मचारी संघटना नांदेड मधील सर्व कर्मचा-यांनी कार्यालयासमोर निदर्शने केली. प्रमुख मागण्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी या ३२ पदांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर प्रलंबित असून तो तातडीने मंजूर करावा.,कार्यालय अधीक्षक पदाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात यावेत.सहाय्यक मोटार वाहन अभियंता पदाचे सेवानियम नसल्यामुळे विभागातील विधी पदवीधरांना नियुक्ती मिळत नाही, त्यामुळे सेवानियम तयार करावेत.

वर्ग-३ संवर्गातील सर्व पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात यावेत.लिपिक टंकलेखक आणि वरिष्ठ लिपिक या पदांची नावे बदलून अनुक्रमे परिवहन सहाय्यक आणि वरिष्ठ परिवहन सहाय्यक करण्यात यावीत.आश्वसित प्रगती योजना (-उझ/च-उझ) अंतर्गत वरिष्ठ लिपिक व कार्यालय अधीक्षक कर्मचाऱ्यांना सेवा लाभ देण्यात यावेत.या मागण्या साठी निदर्शने व घोषणा दिल्या. यावेळी आर.एन.गोरे.एस.आर.केंद्रे आर.एल. गाजुलवाड जी.एम.शिंदे आर.एच. कंधारकर,जि.के.पवळे एन. आर. देवदे,दिलीप गाडचेलवार पी.पी. सातपुते पी.जी.मरवाळे, रवी सानप, ए.एस. केंद्रे, एम.डी.पोकले. एन.जी. कुंडगीर एस.जी.कोंगलवार, भगीरथ ठाकरे व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## अपघातात मृत्यू झालेल्या व्यापारी गंगाप्रसाद नामेवाड यांच्या कुटुंबीयांची

# ॲड. किशोर देशमुख यांच्याकडून सांत्वनपर भेट

तामसा प्रतिनिधी : तामसा येथील प्रतिष्ठित व्यापारी गंगाप्रसाद नामेवाड यांचा हिमायतनगर-सरसम मार्गावरील सरसम पाटीजवळ झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे तामसा परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सर्व स्तरातून नामेवाड कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत.

या पार्श्वभूमीवर भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांनी नामेवाड यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी नामेवाड यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत कुटुंबीयांना धीर दिला. तसेच या कठीण प्रसंगी आपण कुटुंबासोबत असल्याची भावना व्यक्त केली.

या सांत्वनपर भेटीप्रसंगी भाजपा तालुका अध्यक्ष बाळा पाटील, डॉ. दिपक नाईक, ग्रामपंचायत सदस्य शिवराज वारकड, सचिन तांदळे, डॉ. संदीप कारजंकर, अर्जुन जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

गंगाप्रसाद नामेवाड हे तामसा येथील सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात परिचित व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या अकाली निधनामुळे व्यापारी वर्गासह सर्वसामान्य नागरिकांमध्ये शोककळा पसरली असून त्यांच्या स्मृतींना उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कुटुंबाचा संसार उघड्यावर आल्यानं वृद्ध आई, पत्नी, बारा वर्षाच्या मुलगा यांचा उदरनिर्वाहासाठी शासनाच्या दारी पाठपुरावा करण्याचे आश्वासन एड.देशमुख यांनी दिले



# विधानपरिषद निवडणूक मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

नांदेड महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या मतदानाची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी यादृष्टीने गुरुवार १८ जून २०२६ रोजी मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत, असे जिल्हादंडाधिकारी नांदेड कार्यालयानी कळविले आहे. नांदेड जिल्हयातील तहसिल कार्यालय नांदेड, किनवट, हदगाव, भोकर, कंधार, धर्माबाद, बिलोली, देगलूर या मतदान केंद्र परिसरात गुरुवार १८ जून २०२६ रोजी मतदान केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतीरिक्त इतर खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामाव्यतीरीक्त इतर व्यक्तीस प्रवेश करण्याकरीता प्रतिबंधीत करण्यात आले आहे.हा आदेश, नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या अनुषंगाने नांदेड जिल्हा हद्दी पावेतो मतदानाच्या दिवशी गुरुवार १८ जून २०२६ मतदान सुरु झाल्यापासून मतदान संपेपर्यत मतदान केंद्र परिसरासाठी अंमलात राहील असे आदेश जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत.

नांदेड महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या मतदानाची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी यादृष्टीने गुरुवार १८ जून २०२६ रोजी मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू

# दतमंदीर श्रीपाद नगर जुना कौठा येथे कलशोहरण सोहळा उत्साहात, हजारों भाविकांची उपस्थिती

नवीन नांदेड - श्रीपाद नगर जुना कौठा येथील स्वामी समर्थ,दंत, नर्मदेश्वर महादेव मंदिर येथे अधिक मास निमित्ताने कलशारोहन सोहळा १७ जुनं रोजी सकाळी यदुबन महाराज कौलंबीकर कौलंबी मठाधिश यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला यावेळी मंदिर अध्यक्ष विठ्ठल काळे यांनी कलशारोहण विधीवत पूजन नंतर करण्यात आले यावेळी भाविकांनी मोठ्या प्रमाणात जयघोष केला, हभप माऊली महाराज मुंडेकर यांच्या काल्याचा किर्तनाने उत्साहात या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली यावेळी आयोजित करण्यात आलेल्या भागवत कथा प्रवचक हभप प्रविण शास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतुन संगीतमय कथा संपन्न झाली.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १० जुनं ते १६ जुनं उत्साहात सुरुवात झाली,प्रारंभी सकाळी श्रीपाद नगर जुना कौठा भागात श्रीमद भागवत कथा कलश मिरवणूक काढण्यात आली.अधिकमास निमित्ताने श्रीमद भागवत कथा व कलशोहरण सोहळ्याला श्री यदुबन महाराज कौलंबीकर कौलंबी मठाधिश यांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता, श्रीमद भागवत कथा प्रवचक वेदशास्त्र संपन्न ह.भ.प. प्रवीण शास्त्री केळीकर यांच्या समुधर वाणीतुन १० ते १६ जनु रोजी दुपारी आयोजित करण्यात आली होती,१० जुनं रोजी आयोजित श्रीमद् भागवत कथा कलश मिरवणूक सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली होती, हभप भागवत कथाकार हभप प्रविण शास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतुन संगीतमय कथा आयोजित करण्यात आली आहे. १७ जुनं रोजी हभप माऊली महाराज मुडीकर यांच्ये सकाळी १० ते १२ काल्याच्ये कीर्तनानंतर लगेच महाप्रसाद माजी जिल्हा परिषद सदस्य तथा नगरसेवक प्रतिनिधी गंगाप्रसाद काकडे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता,





या सोहळ्याला माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे,नगरसेवक प्रतिनिधी राजु पाटील काळे,पंजाब काळे, गंगाप्रसाद तोष्णीवाल, रोहीत शास्त्री आडकलवार, यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी सप्ताह मध्ये दैनंदिन यजमान आरती करणाऱ्या भाविक भक्तांच्या व प्रमुख उपस्थिती असलेल्या मान्यवर यांच्या सत्कार व स्वामी समर्थ फोटो देऊन करण्यात आला.तिनही मंदिर साठी कलशारोहण विठ्ठल काळे,महेश बिऔगेवार , चंद्रकांत काळे यांनी अर्पण केला.नरोबा देवस्थान मंदिर समितीचे विश्वस्त या वेळी उपस्थित होते.

अखंड हरिनाम सप्ताह व कलशोहरण सोहळा यशस्वीतेसाठी आयोजक विठ्ठल गोविंदराव काळे (पाटील) मंदिर समिती अध्यक्ष व सर्व सदस्य श्री स्वामी समर्थ, दत्त व नर्मदेश्वर महादेव मंदिर, श्रीपाद नगर, जुना कौठा नांदेड यांनी परिश्रम घेतले.

# कोलंबी उपसा सिंचन प्रकल्प पूर्णत्वास; नायगावच्या शेतकऱ्यांसाठी समृद्धीची नवी पहाट



नायगाव /प्रतिनिधी

नायगाव तालुक्याच्या कृषी विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा कोलंबी उपसा सिंचन प्रकल्प अखेर पूर्णत्वास आला असून, बळेगाव-घुगराळा डी.सी. चेंबरपर्यंत पाणी पोहोचल्याने प्रकल्पाच्या यशस्वीतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हा प्रकल्प साकार झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, आर्थिक समृद्धीच्या नव्या पर्वाची सुरुवात होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीवरील विष्णुपुरी प्रकल्पाशी संलग्न असलेल्या या योजनेद्वारे बळेगाव येथून जलवाहिनीद्वारे पाणी नायगाव परिसरातील शेतीपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. यासाठी सुमारे ३० किलोमीटर लांबीची जलवाहिनी उभारण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे नायगाव तालुक्यातील जवळपास १० हजार एकर क्षेत्र ओलिताखाली येणार असून सुमारे ३४ ते ३५ गावांतील शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ होणार आहे.

पावसाच्या लहरीपणामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी संकटांचा सामना करावा लागत होता. सिंचनाच्या अभावामुळे पीक उत्पादनावर परिणाम होत होता. मात्र आता वर्षभर पाण्याची उपलब्धता निर्माण झाल्याने दुबार-तिबार पिके घेणे शक्य होणार असून उत्पादनवाढीसह शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिद्धार्थ इन्फ्राटेक प्रा. लि. या कंपनीमार्फत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले. प्रकल्प गुत्तेदार मयूर पाटील, कार्यकारी अभियंता बन्सोड तसेच कनिष्ठ अभियंता दूधगावकर यांनी प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी विशेष योगदान दिल्याचे सांगितले जात आहे.

शासनाच्या आदेशानंतरच पाणी वितरण

प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत उपविभागीय अभियंता अरुण आणकुलवार व गुत्तेदार मयूर पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, डी.सी. चेंबरपर्यंत पाणी पोहोचले आहे. प्रकल्पाची चाचणी पूर्ण झाली असून काही ठीकाणी वाल खोलून ठेवल्याने पाणी लीकिज काढून सध्या शेतकऱ्यांना जनावरे पाणी पिण्यासाठी देण्यात येणार आहे. शासनाकडून अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतरच शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्याबाबत निर्णय घेतला जाईल. असे त्यांनी भ्रमण ध्वनीवर बोलताना सांगितले.

अनेक वर्षे रखडलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे काम पूर्ण झाल्याने नायगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असून तालुक्याच्या आर्थिक प्रगतीलाही मोठी चालना मिळणार असल्याचे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत.